# माणूस

शनिवार । २६ जुलै १९७५ । एक रुपया



तव स्मरण संतत स्फुरणदायी आम्हा घडो

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : पंधरावे |
| --- | --- | --- | --- |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २६ जुलै | अंक : आठवा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


**स्वावलंबन हेच आमचे ब्रीदवाक्य.**
**मग त्याकरिता काहीही सोसावे लागो.**

**हिंदी लोकांच्या हिताकरिता आम्ही निर्वाणपदावर**
**उभे राहण्याची तयारी केलेली आहे...**

—लो. टिळक

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० । दूरध्वनी ४३४५९

# पोर्तुगाल

## हुकूमशाहीकडून हुकूमशाहीकडे

वा. दा. रानडे

पोर्तुगालमध्ये दीर्घकाळ लष्करी हुकूमशाही प्रस्थापित होणार काय अशी शंका अलीकडच्या काही घटनांनी निर्माण झाली आहे. तेथील हंगामी सरकारमधून समाजवादी पक्ष आणि पॉप्युलर डेमोक्रॅटस् हे पक्ष बाहेर पडले. त्यानंतर लष्करी नेत्यांनी हंगामी सरकारच बरखास्त केले आणि पंतप्रधान गॉनकाल्व्हिस यांना नवे सरकार बनविण्यास सांगण्यात आले. पोर्तुगालमध्ये सध्या सत्ता आहे ती लष्करी नेते आणि त्यांचे पाठिराखे मॉस्कोवादी कम्युनिस्टांची.

समाजवादी पक्ष आणि प्रोग्रेसिव्ह डेमोक्रॅट्स सरकारामधून बाहेर का पडले? पोर्तुगालमध्ये पाश्चात्य पद्धतीची लोकशाही स्थापन व्हावी आणि तेथे लोकशाही मार्गाने समाजवाद आणावा अशी समाजवादी पक्षाची भूमिका आहे. पॉप्युलर डेमोक्रॅटस् पक्ष समाजवादी नसला तरी त्याचा कल डावीकडे आहे; पण तोही पाश्चात्य लोकशाहीचा पुरस्कर्ता आहे. घटनासमितीच्या निवडणुकीत समाजवाद्यांना सर्वांत जास्त म्हणजे ३८ टक्के व त्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकाची २४ टक्के मते पॉप्युलर डेमोक्रॅटिक पक्षास मिळाली. या दोन पक्षांनी मिळून ६२ टक्के मते मिळविली. देशातील बहुमत आपल्या बाजूला आहे असे या निवडणुकांनी सिद्ध केले असल्याचा या पक्षांचा दावा आहे. घटनासमितीच्या सभासदांना घटना बनविण्याच्या बाबतीत पूर्ण स्वातंत्र्य मिळाले तर आपणास पाहिजे तशी पाश्चात्य लोकशाहीच्या स्वरूपाची घटना आपण बनवू शकू असा विश्वास त्यांना वाटत होता. वास्तविक घटनासमितीच्या निवडणुकांपूर्वीच लष्करी नेते आणि प्रमुख राजकीय पक्ष यांच्यात भावी घटनेच्या स्वरूपाबाबत एक करार झाला होता. घटनासमितीच्या अधिकारांवर बंधने घालणे समाजवाद्यांना पसंत नव्हते; पण त्यांची एक महत्त्वाची अट मान्य झाल्याने या करारास त्यांनी मान्यता दिली. देशात बहुपक्षीय पद्धति कायम ठेवून समाजवाद आणण्यात येईल हे लष्करी नेत्यांनी मान्य केले होते. नवी घटना अमलात आल्यानंतरहि तीन ते पाच वर्षे लष्कराकडे सत्ता राहील अशी एक जाचक लोकशाहीविरोधी अट या करारात होती. प्रतिगामी गटांनी सत्ता हाती घेण्याचा प्रयत्न करू नये म्हणून काही काळ लष्करी नियंत्रण आम्ही ठेवणार आहोत असे लष्करी नेत्यांचे समर्थन होते. समाजवाद्यांना ही अट मान्य नव्हती; पण तिला कालमर्यादा घातली असल्याने तडजोडीसाठी त्यांनी ती मान्य केली.

लष्करी नेते करारात दिलेल्या आश्वासनांचा भंग करून चिरस्थायी हुकुमशाही प्रस्थापित करू पहात आहेत असे त्यांच्या अलीकडच्या काही घोषणांवरून स्पष्ट दिसू लागले आहे. देशात 'डायरेक्ट डेमॉक्रसी' म्हणजे प्रत्यक्ष लोकांकरवीच कारभार पाहण्याची पद्धति सुरू करण्याची योजना त्यांनी नुकतीच जाहीर केली. लोकांनी राजकीय पक्षांचे प्रतिनिधी निवडून द्यावयाचे आणि त्यांनी कायदे करायचे, मंत्री बनून कारभार पहायचा ही त्यांच्या मते अप्रत्यक्ष लोकशाही होय. लोक आणि सरकार यांच्यामध्ये राजकीय पक्षांचा दलाल हवा कशाला? असे लष्करी नेते स्पष्ट म्हणत नसले तरी तेच त्यांना अभिप्रेत आहे. स्थानिक पातळीपासून वरिष्ठ पातळीपर्यंत लोकसमित्या स्थापल्या जावयाच्या आहेत. खालच्या समितीने वरच्या समितीचे प्रतिनिधी निवडावयाचे अशा पद्धतीने या समित्या बनतील. आर्मड् फोर्सेस मुव्हमेंट ही लष्करी नेत्यांची संघटना,

पृष्ठ २४ वर



# सोलकढी

## □ माणसांचे सुख हेच प्राण्यांचे समाधान

अखिल सजीवसृष्टीत माणूस सर्वश्रेष्ठ होय, ही गोष्ट वाघसिंह, गरुडगिधाडे, वडपिंपळसुद्धा मान्य करतात. माणसांचा त्यांना धाक वाटत असला पाहिजे. माणसाचे सुख हेच त्यांचे समाधान असते. माणसाला याचे नेमके ज्ञान झालेले आहे. त्यामुळे माणूस त्यांना जास्तीतजास्त समाधान द्यायला झटत असतो. गाईम्हशीशेळ्या माणसाला दूधदुभते पुरवतात; पाळीव प्राणी-पक्षी त्याला सोबत देतात—त्याचे रंजन करतात; काही प्राणी प्रयोगशाळेतल्या संशोधनाच्या कामी येतात. यापेक्षाही अवघड आणि नेमकी सेवा माणूस त्यांच्याकडून करवून घेऊ शकतो : कबुतरे निरोप्याचे काम करतात; उंट-खेचरे भली मोठी ओझी वाहतात; हत्ती-घोडे वाहतुकीला मदत करतात; शोधक आणि राखणदार म्हणून कुत्रे उपयोगी पडतात; मॅगपाय पक्षी माणसाच्या वतीने चोऱ्या करतात; इतके कशाला, साळुंक्या-पोपट भविष्यसुद्धा सांगतात. (स्वाध्याय : १. या विवेचनाच्या आधारे, वनस्पती माणसाला जी मदत करतात तिची तुमच्या शब्दात सोदाहरण माहिती द्या—आवश्यक तेथे आकृत्या काढा. २. या निमित्ताने माणूस आणि वनस्पती यांच्यात होणारे संवादनाटय चि. बाळ कोल्हटकरांच्या शैलीत लिहा आणि त्यांच्याच शैलीत मोठ्याने म्हणा. ३. वनस्पतिशास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस आणि 'वनस्पतींचा जादूगार' बरबँक यांची चरित्रे वाचा. चरित्रातली त्यांची छायाचित्रे नीट कापून ती आपल्या चिकटवहीत चिकटवा. चिकटवताना मागचा गोंद मागेच राहील, पुढे येणार नाही, याची काळजी घ्या.)

आणखी काही प्राणी आपल्याला सुख देऊन समाधान मिळवू शकतील, असे अलीकडे माणसाला उमगू लागले आहे. उदाहरणार्थ, डॉल्फिन. माणूस सोडता सगळ्या प्राण्यांत डॉल्फिन सर्वांत बुद्धिमान होय, असे म्हणतात. माकडेसुद्धा डॉल्फिनएवढी हुशार नसतात म्हणे. डॉल्फिनना प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून जोखमीची आणि खर्चिक कामे करून घेतली जातात. काही प्राणीशास्त्रज्ञांनी तर डॉल्फिन आणि कासवे यांच्याशी संवाद साधायचा प्रयत्न चालवला आहे....... मोठ्या कानांच्या आणि आयाळवाल्या सील माशाला 'सी लायन' म्हणतात. प्रशिक्षण आणि यांत्रिक साहाय्य यांच्या जोरावर सी लायन खोल पाण्यात बुडी मारून बुडालेल्या वस्तू वर आणू शकतो. त्याला पाणबुडीचा वेध घेता येतो. अमेरिकन नौदलाचा एक प्रवक्ता तर असे मानतो की सी लायनकडून अक्षरश: चाहेल ते काम माणसाला करवून घेता येईल; त्याला खायला हवे तेवढे मासे दिले की झाले. सी लायनची उपयुक्तता ओळखून अमेरिकन नौदलाने सध्या सहा सी लायन्सना भरती केले आहे.

प्राण्यांचे राहू दे. माणसांनासुद्धा प्राण्यांप्रमाणे आपल्या कामी लावायचे भाग्य काही सरमाणसांना लाभत असते. अशा वेळी, प्राण्यांची खास कामेसुद्धा माणसेच त्या प्राण्यांपेक्षा अधिक डौलाने आणि निष्ठेने करू शकतात, याची साक्ष पटून मनुष्यजातीच्या एकूण कर्तबगारीबद्दल अबबबब अभिमान वाटू लागतो !

—अनंतराव




¤ रविवार दिनांक ६ जुलै १९७५ च्या 'केसरी'च्या अंकात, 'गुंतता हृदय हे' नाटकातल्या कल्याणीच्या पद्मा चव्हाण आणि आशालता वाबगावकर यांनी सादर केलेल्या भूमिकांचा तौलनिक विचार करणाऱ्या लेखात एके ठिकाणी शरद गोखले म्हणतात. : केवळ 'गुंतता हृदय हे' या नाटकाच्या संदर्भामध्ये विचार न करता पद्मा चव्हाण आणि आशालता या दोघींच्या दीर्घ वाटचालीवर नजर टाकली तर आशालताबाईंचं पारडे थोडेफार जडच आहे.

आम्हाला बुवा दोघींची पारडी सारखीच जड वाटतात. काशिनाथाची शप्पत.

¤ एक वातमी : महाराष्ट्र राज्य क्रीडासमितीची गेली बैठक ४ फेब्रुवारी १९७४ रोजी भरली होती. त्यानंतरची बैठक, तब्बल ५३५ दिवसांच्या विश्रांतीनंतर, येत्या चोवीस तारखेला भरणार आहे.

या विश्रांतिकालात समितीसदस्यांच्या वैयक्तिक आणि सामुदायिक क्रीडा चालू असाव्यात. ¤

१२ ऑक्टोबर १९७२. युरुग्वे एअर फोर्सच्या ' फेअरचाईल्ड एफ्–२२७' या विमानानं पंचेचाळीस प्रवाशांसह आकाशात झेप घेतली. रग्बी खेळाडूंचा हौशी संघ चिलीकडे निघाला होता. अँडीज पर्वत ओलांडून त्यांना जायचं होतं.

अँडीज हा हिमालयाच्या बरोबरीचा पर्वत-समूह. त्याची लांबी जगामध्ये सर्वांत जास्त. त्यावरून विमान जाऊ लागलं आणि अचानक ते ढगात शिरलं. हिमवर्षाव चालूच होता. झंझावाती वाऱ्यानं विमानाला दोन प्रचंड तडाखे दिले. दुपारी ३–३० वाजता वैमानिकानं सँटियागो विमानतळावर ' सब ठीक 'चा संदेश दिला.

परंतु त्यानंतर एकाच मिनिटाने सँटियागो टॉवरचा विमानाशी संपर्क तुटला. पुढचे आठ दिवस चिली, अर्जेंटिना आणि युरुग्वेच्या लोकांनी जारीने शोध घेण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. अँडीजची शेकडो मैल लांबी, वादळ आणि हिमवृष्टी लक्षात घेता विमान सापडण्याची शक्यता जवळजवळ नाहीशी झाली. उतारूंपैकी कोणीही वाचण्याचा संभव तर अजिबात नव्हता.

दहा आठवड्यांनंतर एक चिली शेतकरी आपल्या गुरांना चारण्यासाठी अँडीजच्या खोल दरीत गेला असताना त्याला दूरवर दोन माणसांच्या आकृत्या दिसल्या. त्यांचं स्वरूप भयानक होतं आणि ते गुडघ्यांवर खुरडत होते. शेतकऱ्याला जवळ येण्यासाठी जोरजोरात खुणावत होते. भीतीमुळे त्यानं दुरूनच रुमालातून कागद आणि पेन त्यांच्याकडे फेकलं. दाढी वाढलेल्या, भकास चेहेऱ्यांच्या आणि कपड्यांच्या चिंध्या झालेल्या त्या इसमानं काहीतरी लिहून कागद परत फेकला. त्यावर लिहिलं होतं : ' पर्वतावर कोसळलेल्या विमानातील मी एक उतारू आहे. मी युरुग्वेचा रहिवासी....'

अपघातात बचावलेल्या सोळा लोकांची आणि त्यांच्या सत्तर दिवसांची हृदयद्रावक सत्यकथा....

---

**मूळ लेखक : पियर्स पॉल रीड**

**अनुवाद : रवींद्र गुर्जर**

**लेखांक : एक**

---



: १ :

'**युरुग्वे**' हा दक्षिण अमेरिकेतील एक छोटासा देश आहे. ब्राझील आणि अर्जेंटिना त्याच्या नजिकचे प्रांत. प्रदेशातील मुख्य नदी आहे 'प्लेट'. जिकडे तिकडे हिरवीगार कुरणं पसरलेली आहेत. त्यावर पाळीव प्राणी पुष्ट होतात तेथील लोक व्यापार, वकिली किंवा वैद्यकीय व्यवसाय चालवून मजेत राहतात. लोकतांत्रिकपद्धतीनुसार हा देश विसाव्या शतकात खूप पुढे आला आहे.

इंग्रजी शिक्षणाची दैन्यावस्था असल्यामुळे तेथील लोकांनी आयर्लंडच्या 'ख्रिश्चन बंधूं'ना पाचारण केलं. निमंत्रण मान्य करून पाच आयरिश बंधू 'मॉन्टेव्हिडिआ'मध्ये दाखल झाले. मॉन्टेव्हिडिआ हे राजधानीचं शहर. त्याच्या 'कॅरास्कों' या उपनगरात मे १९५५ मध्ये त्यांनी 'स्टेला मॅरिस कॉलेज' सुरू केलं. त्यात नऊ ते सोळा यामधील वयाच्या मुलांनाच फक्त प्रवेश होता.

ख्रिश्चनबंधू युरुग्वेच्या शांत जीवनात रमले आणि त्यांनी शाळा चांगली नावारूपास आणली. आईवडिलांविषयी मुलांना वाटणारा आदर शाळेतील शिक्षकांनी संपादन करण्यास सुरुवात केली. त्यामुळे उत्तम संस्कार आणि योग्य वर्तणूक या गोष्टींना महत्त्व प्राप्त झाले. विद्यार्थी जबाबदारीनं वागू लागले. परंपरागत छडीचा वापर बंद झाला.

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही, लग्न होईपर्यंत मुलं-मुली पालकांजवळच राहत असत. युरोपमध्ये ही प्रथा केव्हाच बंद पडली होती. ख्रिश्चन बंधू मात्र सनातनी विचारांचे असल्यामुळे त्यांच्याच शाळेत आपल्या मुलांना पाठवण्यात लोकांना धन्यता वाटे. दुसरंही एक महत्त्वाचं आकर्षण होतं, ते म्हणजे रग्बी फूटबॉल.

'स्टेला मॅरिस' सुरू होईपर्यंत रग्बी खेळ फारच क्वचित खेळला जाई. ख्रिश्चन बंधूंनी या खेळाला अमाप लोकप्रियता मिळवून दिली. इतकंच काय तर थोड्याच दिवसात त्याला राष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालं. रग्बीमध्ये सहनशक्ती आणि सांघिक एकता या गोष्टींचं शिक्षण मिळतं. त्याचा प्रत्यक्ष जीवनातही खूप उपयोग होतो आणि यामुळेच लोकांना रग्बी खेळाविषयी विलक्षण जिव्हाळा वाटू लागला.

विद्यार्थी शाळेत वाढत्या उत्साहानं खेळात भाग घेऊ लागले. पहिल्या पिढीचा शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतरही, पदवी संपादन केल्यावरही, त्यांना कॉलेज किंवा रग्बी सोडता सोडवेना. त्यातूनच १९६५ मध्ये 'ओल्ड ख्रिश्चन क्लब'ची स्थापना झाली. माजी विद्यार्थ्यांनी त्यात पुढाकार घेतला. दर रविवारी दुपारी त्यांच्यात रग्बीचे सामने होत.

प्रत्येक सुट्टीमध्ये क्लबच्या सदस्यसंख्येत वाढच होत गेली. टीम तयार करण्यासाठी निवडीला भरपूर वाव मिळू लागला. इतरत्र असेच संघ स्थापन होतच होते, परंतु देशातील सर्वांत उत्तम संघ 'ओल्ड ख्रिश्चन फर्स्ट फिफ्टीन' हाच गणला जाई. सन १९६८ मध्ये आणि पुन्हा १९७० मध्ये त्यांनी राष्ट्रीय अजिंक्यपद प्राप्त केलं. यशाबरोबरच महत्त्वाकांक्षा वाढू लागली. अर्जेंटिनाला जाऊन तिथल्या संघाशी ते सामना खेळून आले आणि १९७१ मध्ये तर त्यांनी चिलीला जाण्याचा निर्णय घेतला. प्रवासखर्च झेपावा म्हणून क्लबनं युरुग्वे एअर फोर्सचं एक विमान भाड्यानं घ्यायचं ठरवलं. संघाला लागणाऱ्या जागांव्यतिरिक्त इतर जागा आप्तेष्ट आणि मित्रमंडळींना तिकिटे विकून भरल्या गेल्या. ही सहल अत्यंत यशस्वी झाली. चिलीच्या संघाबरोबर दोन सामने झाले. प्रत्येक संघानं एक एक सामना जिंकला. जोडीला परदेशाची सफरही झाली. खूप जणांचा तर तो दूरचा असा पहिलाच प्रवास होता. अँडीजची उत्तुंग बर्फाच्छादित शिखरं आणि खोल दऱ्या पाहून ते विस्मित झाले, सुखावले. सॅंटियागोहून परततात पुढच्या वर्षी पुन्हा तशीच सफर करण्याचं त्यांनी पक्कं केलं. ¤

: २ :

पुढच्या सीझनला मात्र ठरलेल्या योजनेत अनिश्चितता निर्माण झाली. नको इतक्या आत्मविश्वासापायी ओल्ड ख्रिश्चन संघानं राष्ट्रीय विजेतेपद गमावलं. प्रतिस्पर्धी संघ तसा वरच्या दर्जाचा नव्हताही. परिणामतः क्लबच्या अधिकाऱ्यांनी विचार केला की पुन्हा चिलीला जाण्याचं काहीच प्रयोजन नाही. दुसरी अडचण म्हणजे एअर फोर्सच्या 'फेअर चाइल्ड एफ्-२२७' या विमानाच्या चाळीसएक जागा कशा काय भरायच्या? विमानाच्या भाडेकरारापोटी १६०० डॉलर्स पडणार होते. जर चाळीस जागा भरल्या तर येऊन जाऊन प्रत्येकी फक्त ४० डॉलर्स खर्च येणार होता. नेहमीचा व्यापारी तिकिट-दर याच्या तिपटीहून अधिक होता. जितक्या कमी जागा भरतील तितका प्रत्येकी खर्च वाढणार; शिवाय चिलीमधील पाच दिवसांच्या वास्तव्याचा खर्च निराळाच.

सहल रद्द होण्याची शक्यता निर्माण होताच, ज्यांना जायची तीव्र इच्छा होती त्यांनी आपापले मित्र आणि हितचिंतक यांना बरोबर येण्याची गळ घातली. रग्बी खेळाडूंनी चिलीतल्या स्वैर युवतींची भडक वर्णनं सांगितली. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन एका मुलाची आई आणि बहीण, दुसऱ्याची चुलत बहीण अशा रीतीनं लवकरच पुरेशा जागा भरल्या. बेत पक्का झाला.

गुरुवार, १२ ऑक्टोबर १९७२. कॅरास्कोच्या विमानतळावर सकाळी सहा वाजता उतारू जमायला सुरुवात झाली. मुलांचे नातलग आणि मित्रमैत्रिणी निरोप द्यायला आले होते. विमानतळ आंतरराष्ट्रीय असूनही आहे लहानसंच. तिथे सर्वत्र आनंद आणि उत्साहाचं वातावरण पसरलं होतं. अत्याधुनिक कपडे आणि ब्लेझर घातल्यामुळे संघातील खेळाडू आकर्षक दिसत होते. सर्व मुलांचे आईवडील एकमेकांना ओळखत होते. पन्नास-साठ जणांना एकत्र हसता खिदळताना पाहून कोणालाही असं वाटलं असतं की त्यांनी मेजवानीसाठी विमानतळ निवडलेला होता.

या सर्व गडबडगोंधळात दोन काहीशा वेंधळ्या दिसणाऱ्या व्यक्ती मात्र शांतपणे उभ्या होत्या. एक 'फर्स्ट फिफ्टीन'चा कॅप्टन 'मार्सेलो पेरेझ' आणि दुसरा ओल्ड ख्रिश्चनचा अध्यक्ष 'डॅनियल वॉन'. पेरेझ मोठ्या खुशीत दिसत होता. चिलीची सहल ठरवण्यात त्याचाच मुख्य पुढाकार होता. ती रद्द होण्याची शक्यता निर्माण झाल्यावर सर्वांत अधिक दुःख त्याला झालं होतं. अजूनही एखादा

प्रश्न त्याच्यापुढे उपस्थित केला की केसांची पीछेहाट होत असलेल्या त्याच्या कपाळावर सूक्ष्म आठी पडत होती. असाच एक प्रश्न म्हणजे अजून 'गिल्बर्टो रेग्यूल्स'चा पत्ता नव्हता. त्याचा संघात समावेश होता. घरी फोन केला तर तो कोणी उचलतच नव्हतं.

त्याची जास्त वेळ वाट पाहता येणार नव्हती. 'फेअर चाइल्ड' तळावर केव्हाच हजर झालं होतं. शिवाय अँडीजवरून दुपारी उडणं अशक्य होतं. अर्जेंटिनावरून येणारे गरम वारे आणि पर्वतावरील थंड वारे यांच्या तडाख्यात विमानाचा टिकाव लागणं शक्य नव्हतं.


प्रवासाला निघालेल्या मुलांची वयं अठरा ते सव्वीसच्या दरम्यान होती. संघाव्यतिरिक्त इतरही बरेच विद्यार्थी गंमत म्हणून सामील झाले होते. तीन मुलांनी अलिकडेच वैद्यकीय शाखेत प्रवेश मिळवला होता. त्यातले दोघं खेळणार होते. सर्वजण वरच्या वर्गात मोडणारे होते. मॉन्टेव्हिडिओ आणि आसपासच्या श्रीमंत घराण्यापैकी ते होते.

परंतु एकजात सर्व तरुणच होते असं मात्र नाही. त्यांच्यात एक मध्यम वयाची 'सिनोरा मेरियानी' देखील होती. आपल्या मुलीच्या लग्नासाठी तीं चिलीकडे निघाली होती. आणखी दोन प्रौढ दांपत्य, शिवाय एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व असलेली वीसएक वर्षांची उंच तरुणीही होती– सुसान पेरॅडो. कस्टम तपासणीसाठी ती, आई आणि आपला भाऊ 'नॅन्दो' यांच्यासमवेत रांगेमध्ये उभी होती. तिचे वडील त्यांना निरोप द्यायला आले होते.

सामानतपासणी उरकल्यावर पेरॅडो कुटुंबानं नजीकच असलेल्या उपहारगृहात नाश्ता उरकला. जवळपासच्या टेबलांवर इतरही काही प्रवासी बसले होते. उंची कपड्यांमुळे पेरॅडो कुटुंब विशेषत्वानं लक्ष वेधीत होतं याची त्यांनाही जाणीव असलेली दिसत होती. सुसान आणि तिचा भाऊ, दोघंही खूपच उंच होते: करड्या रंगाचे सुंदर केस, निळे डोळे आणि मृदू गोल चेहेरा ही त्यांची वैशिष्ट्ये होती; पण त्यांचा भपका वाटत नव्हता. उलट नॅन्दो लाजराच दिसत होता. त्यानं चष्मा लावला होता. सुसानचा चेहेरा प्रसन्न आणि गोड होता. आकर्षक पण सौम्य व्यक्तिमत्त्व.

तिची कॉफी संपताच उड्डाण जाहीर झालं. घाईघाईनं प्रवासी मंडळी पुन्हा एकदा कस्टम आणि पासपोर्टच्या परिपाठातून पार पडली आणि विमानाच्या दिशेनं जाऊ लागली. समोर शुभ्र चमकणारं विमान उभं होतं. अॅल्युमिनियमच्या शिडीवरून चढून सर्वांनी विमानात प्रवेश केला. दोन्ही बाजूंना दोन दोन जागा, मधे ये–जा करण्यासाठी पॅसेज होता. सर्वजण स्थानापन्न झाले. गाजत असलेली चिलीची सफर थोड्याच क्षणात सुरू होणार होती.

बरोबर आठ-पाचला फेअरचाइल्डनं उड्डाण केलं. एअरफोर्सचं ते ५७१ क्रमांकाचं विमान होतं. 'कॅरास्को ते चिलीची राजधानी सॅन्टियागो.' चाळीस प्रवासी आणि पाच विमानातील नोकर. अर्थातच सामानसुमानासह. मुख्य वैमानिक होता कर्नल ज्युलिओ सेझर फेरॅडस. त्यानं एअरफोर्सची वीस वर्षं सेवा बजावली होती. विमान चालवण्याचा त्याला ५११७ तासांचा अनुभव होता. अँडीज पर्वतावरील धोक्याचा प्रवासही त्यानं एकोणतीस वेळा केला होता. सहवैमानिक म्हणून लेफ्टनंट डॅन्टे हेक्टर लागूरारा आला होता. तो फेरॅडसहून वयानं मोठा होता, पण त्याच्याइतका अनुभवी मात्र नव्हता. म्हणून फेरॅडसच्या देखरेखीखाली अधिक अनुभव संपादन




करण्यासाठी तो आला होता.

तो चालवत असलेलं विमान–फेअर चाइल्ड एफ्–२२७–अमेरिकेत तयार झालं होतं. दोनच वर्षांपूर्वी युरुग्वे एअरफोर्सनं ते विकत घेतलं. त्याला दोन इंजिनं बसवलेली होती. मेरीलँडहून फेरॅडस स्वतः ते घेऊन आला होता: तोपर्यंत फक्त ७९२ तास ते उडलं होतं. वैमानिक पारिभाषेत ते अजून नव्यामध्ये जमा होतं. वैमानिकांच्या मनात शंका आलीच तर ती फक्त अँडीजवरील वादळी हवामानाबद्दल असणार होती. तीन महिन्यांपूर्वीच सहाजण असलेलं एक विमान त्या पर्वतावर अदृश्य झालं होतं.

एकूण अंतर नऊशे मैलांचं होतं. लागूरारा 'ब्यूनोस आयर्स' आणि 'मेंडोझा' या तळांवरून सरळ सॅन्टियागोला रवाना होणार होता. २४० नॉट या वेगानं एकूण चार तासांचा अवघा प्रवास. त्यातला शेवटचा अर्धा तास अँडीज पर्वत ओलांडायला लागणार होता. सकाळी आठला निघाल्यामुळे मध्यान्ह होण्याआधी ते पर्वतापर्यंत पोचणार होते. त्यामुळे दुपारी तिथे नित्यशः होणाऱ्या धोकादायक वादळापूर्वी फेअरचाइल्ड मुक्कामाला सहज जाणार होतं. शंभर मैल पसरलेल्या अँडीजची सरासरी उंची १३००० फूट होती. काही शिखरं २०,००० फुटांपर्यंत होती आणि मेंडोझा–सॅन्टियागोमधील एक शिखर–अकोनकागुआ–२२८३४ फूट उंच होतं. माउंट एव्हरेस्टहून त्याची उंची ६००० फुटांनीच कमी होती.

फेअरचाइल्ड जास्तीत जास्त २२,५०० फूट उडू शकत होतं. अर्थातच त्याहून कमी उंचीच्या मार्गानं त्याला पर्वत ओलांडणं क्रमप्राप्त होतं. आकाश स्वच्छ असताना एकूण चार पर्यायी मार्ग होते–जुंकल, हा सगळ्यात कमी अंतराचा; नीव्हज, अल्वारेंडो किंवा प्लँकन. हवा खराब असताना फक्त प्लँकनवरून जाणं शक्य होतं. ते ठिकाण मेंडोझाच्या दक्षिणेला शंभर मैलांवर होतं. जुंकलची किमान उंची २६००० होती. इतर दोन मार्गांवर रेडिओटॉवर नव्हते. धोका फक्त शिखरांवर आदळण्याचा नव्हता. पर्वतावरील हवामान अत्यंत अस्थिर आणि घातकी होतं. चौदा ते सोळा हजार फुटांपर्यंत पूर्वेकडून येणारे उष्ण वारे पोचत. जोडीला पश्चिमेकडील पॅसिफिकवरून कमी दाबाच्या पट्ट्यामुळे घुसणारे झंझावाती वारे होतेच. यांच्या वर्तुळात विमान सापडलं तर पाचोळ्याप्रमाणे ते सहज फेकलं जाणं शक्य होतं. या सर्व गोष्टी विचारात घेऊनच लागूरारानं मेंडोझा विमानतळाशी संपर्क साधला.

उतारूंमध्ये काळजीची कोणतीही निशाणी दिसत नव्हती. मुलं गप्पा मारत होती, हसत होती; वाचन नाही तर पत्त्यांमध्ये रमली होती. मार्सेलो पेरेझ रग्बी खेळाडूंबरोबर चर्चा करत होता. आपल्या आईजवळ बसलेली सुसान जवळपासच्या मुलांना चॉकलेट्स वाटत होती. त्यांच्या मागे नॅन्दो पेरॅडो अत्यंत जिवलग मित्रासमवेत बसला होता : पँकिटो अेबल.

दोघंही एकमेकांना सदैव धरून असत. त्यांचे वडील मोठे उद्योगपती होते. मुलं वडिलांच्या धंद्यात लक्ष घालत होती. पेरॅडोचा नट आणि बोल्टचा व्यापार आणि अेबल तंबाखूची घाऊक विक्री करीत होता. त्यांची मैत्री वरकरणी आश्चर्यकारक वाटायची. अेबल रुबाबदार, मनमोकळा आणि श्रीमंत; शिवाय उत्तम रग्बीपटू : तर पेरॅडो विचित्र स्वभावाचा, लाजरा आणि दिसायला बऱ्यापैकी असूनही खास आकर्षक नव्हता. त्याचा खेळही मध्यम प्रतीचा होता.

धंदा आणि रग्बीव्यतिरिक्त त्यांच्या समान आवडी म्हणजे गाड्या आणि पोरी उडवणे. त्यामुळे त्यांना प्लेबॉईज म्हणत. युरुग्वेमध्ये मोटार बाळगणं ही खर्चाची बाब होती. त्या प्रत्येकाच्या दिमतीला एक एक गाडी होती. शिवाय मोटारसायकलीही होत्या. त्यावरून ते मुलींना घेऊन किनाऱ्यावर भटकत. अर्थातच गमत्या स्वभावामुळे अेबलच मुलींमध्ये अधिक लोकप्रिय होता. भारदस्त व्यक्तिमत्त्वामुळे त्याच्याविषयी चांगले गैरसमज पसरले होते. उलट पेरॅडो जसा दिसायचा तसाच प्रत्यक्षात होता. दोघांचं जग हे एकूण असं होतं.

पेरॅडोच्या नशिबात एक गोष्ट मात्र नक्कीच चांगली होती, ती म्हणजे सुखी–समाधानी एकत्र कुटुंब. अेबलच्या आईवडलांनी घटस्फोट घेतला होता. त्याची आई वडलांपेक्षा बरीच तरुण होती, दोघांनाही लग्नाच्या आधीची मुलं होतीच–अर्थात पूर्वीच्या संसारांपासून आणि आता अेबलनं वडलांबरोबर राहण्याचा निर्णय घेतला होता. ते सत्तरीला झुकले होते. त्याच्या मनाला ही गोष्ट फार लागली होती. म्हणून अधुनमधून तो उदास होई.

अर्जेंटिनाच्या लांबच लांब पसरलेल्या हिरण्यागार शेतांवरून विमान उडत होतं. त्यांचे भूमितीमधील निरनिराळे आकार खिडक्यांमधून स्पष्ट दिसत होते आणि सभोवती झाडं लावलेली छोटीशी घरंही. थोड्या वेळानं त्या दृश्यात बदल होऊन उजवीकडे पसरत जाणाऱ्या लहान-मोठ्या टेकड्या दिसू लागल्या.

अचानक समोर अँडीज पर्वताची हिमाच्छादित शिखरं दिसू लागली. दुरून ती अजस्र करवतीच्या दात्यांप्रमाणे वाटत होती. त्या तरुण प्रवाशांचं अंत:करण भयमिश्रित विस्मयानं दाटून येणं स्वाभाविकच होतं. जगातील एक उत्तुंग पर्वत बघून सर्वजण अवाक् झाले. इतक्यात विमानातील एक नोकर वैमानिकाच्या केबिनमधून बाहेर आला आणि त्यानं लाउडस्पीकरवरून जाहीर केलं की, 'प्रतिकूल हवामानामुळे पुढे जाणं शक्य नाही. मेंडोझा विमानतळावर उतरून परिस्थिती सुधारेपर्यंत वाट बघण्याखेरीज गत्यंतर नाही.'

उतारूंच्या खोलीतून निराशेचे सुस्कारे ऐकू येऊ लागले. चिलीमध्ये फक्त पाचच दिवस मिळणार होते. त्यातला एक दिवस अशा रीतीनं वाया जावा हे त्यांना मंजूर होणं कठीण होतं. पैशांचाही प्रश्न होताच; पण काही इलाज नव्हता, म्हणून त्यांनी आपापले पट्टे आवळले. मेंडोझाची धावपट्टी त्या मानानं खडबडीत होती. सर्वजण फेअरचाइल्डमधे सावरून बसले.

तळावरील इमारतीसमोर विमान थांबताच फेरॅडसनं केबिनमधून बाहेर डोकावलं. त्याबरोबर रॉबर्टो कॅनेसानं त्याचं रुक्ष आवाजात अभिनंदन केलं : विमान सुखरूप उतरल्याबद्दल.

'माझं अभिनंदन करू नका,' फेरॅडस म्हणाला, 'लागुरारा कौतुकाला पात्र आहे.'

'पण परत कधी निघायचं ?' दुसऱ्या मुलानं विचारलं.

कर्नलनं खांदे उडवले. 'कुणास ठाऊक. हवेचा काय विचार आहे ते तर पाहू.' ◻

## : ३ :

वैमानिकाच्या पाठोपाठ सर्व मुलं खाली उतरली. कस्टम्सच्या दिशेनं ते जाऊ लागले. विमानतळाच्या पाठीमागे एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणे पर्वत उभे होते. त्याच्या तुलनेत तिथल्या इमारती, तेलाचे टँक्स आणि झाडं अगदीच खुजी दिसत होती. मुलांचा उत्साह मात्र अजिबात कमी झाला नव्हता. त्यांनी अर्जेंटिनाचं चलन आपल्या जवळचे डॉलर्स देऊन विकत घेतलं. लगेच त्यांचे निरनिराळे गट पडले. बस, टॅक्सी किंवा जमलं तर लॉरी पकडून सर्वजण गावात जायला निघाले.

दुपारच्या भोजनाची वेळ झाली असल्यानं त्यांना सपाटून भूक लागली होती. त्यांचा पहाटे एक तर लवकर नाश्ता झाला होता किंवा काहींनी अजिबात खाल्लं नव्हतं. बरोबरही खाद्यपदार्थ आणलेले नव्हते. एका गटानं जवळच्या रेस्टॉरंटकडे मोर्चा वळवला. त्याचा मालक मूळ युरुग्वेचा नागरिक होता, त्यामुळे जेवणाचे पैसे तो घेणारा नाही असं मुलांना वाटलं.

इतर लोक स्वस्त उपहारगृहाच्या शोधात निघाले. मेंडोझामधे वेळ घालवण्याखेरीज गत्यंतरच नव्हतं. हे अर्जेंटिनामधील सर्वांत जुनं शहर. स्पॅनिश लोकांनी १५६१ मध्ये वसवलं. जुन्या काळाची

आठयण ते अजूनही देत होतं. रस्ते रुंद, कडेला मोठमोठे वृक्ष. थंडीचे दिवस असूनही हवा कोरडी अन् उबदार होती. सार्वजनिक बागांमधील बहरलेल्या फुलांचा गंध हवेत भरलेला होता. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना नीटनेटक्या दुकानांची रांग. कॅफे, रेस्टॉरंट, विविध वस्तूंची दुकानं. शहराबाहेर दारूचे कारखाने होते. तेथील दारू अखिल दक्षिण अमेरिकेत उत्तम म्हणून प्रसिद्ध होती.

पेरॅडो कुटुंब, एबल, सिनोरा मेरियानी आणि दोन मध्यमवयीन दांपत्यांनी त्यातल्या त्यात उंची हॉटेल गाठलं. भोजन उरकल्यावर सर्वजण निरनिराळ्या दिशांना पांगले. एबल आणि पेरॅडोनं संध्याकाळी पेरेझसमवेत ' बार्बारा स्ट्रायझेड 'चा ' व्हॉट्स् अप् डॉक् ?' हा चित्रपट पाहिला तरुण मुलांनी मुली गटवल्या आणि त्यांच्याबरोबर नृत्यालयात रात्र घालवली. अर्थातच पहाटे चारपर्यंत मुक्कामाच्या हॉटेलवर कित्येकांचा पत्ता नव्हता.

त्यामुळे दुसऱ्या दिवशी सगळे खूप उशिरा उठले. निघण्याविषयी कोणतीही सूचना मिळाली नसल्यामुळे पुन्हा एकदा ते शहरात भटकायला बाहेर पडले. पैसे बेताबेतानं खर्च करणं आवश्यक होतं. किरकोळ खरेदीवर त्यांनी भागवलं.

मेडिकलचे दोन विद्यार्थी, रॉबर्टो कॅनेसा आणि गुस्ताव्ह् झेबिनो, कॅफेमधे शिरले. तिथे त्यांनी नाश्ता उरकला. कॉफी पीत असताना त्यांना कॅप्टन पेरेझ दिसला. बरोबर लागूरारादेखील होता. ते दोघांच्या दिशेनंच येत होते. मागून फेरॅडसही आला.

' हाय् !' कर्नल फेरॅडसकडे बघून कॅनेसा ओरडला. ' आपण आता निघू शकू ?'

' अजून नाही, ' तो म्हणाला.

' तुम्ही घाबरताय् का ?' कॅनेसा पुन्हा काहीशा उद्धटपणे म्हणाला, फेरॅडस त्याच्या आवाजाचा स्वर ऐकून क्षणभर वैतागला. पण लगेच त्यानं विचारलं, ' तुमच्या आईवडिलांनी उद्याच्या वर्तमानपत्रात असं वाचलं तर चालेल का, की पंचेचाळीस लोक अँडीज पर्वतावर बेपत्ता ?'

' नाही, ' झेबिनो म्हणाला. ' त्यांनी असं वाचावं, की मोठ्या धाडसानं पंचेचाळीस जणांनी पर्वत ओलांडला. '

दोन्ही वैमानिक हसले आणि निघून गेले. त्यांची मोठी पंचाईत झाली होती. एकीकडे मुलं टोमणे मारत होती. हवामानखात्याच्या अंदाजाप्रमाणे परिस्थिती सुधारत होती. ' जुंकल ' मार्ग फेअरचाइल्डला बंदच होता; पण दुपारपर्यंत ' प्लॅंकन ' स्वच्छ होण्याची शक्यता होती. त्या वेळी अँडीज ओलांडणं खरं म्हणजे धोक्याचं मानलं जाई; पण वादळी वाऱ्यांना टाळून, उंचावरून जाता येईल असा त्यांना विश्वास वाटत होता. दुसरा पर्याय म्हणजे सरळ मॉन्टेव्हिडिओला परतणे. (कारण मिलिटरी विमानानं परकीय भूमीवर चोवीस तासांपेक्षा जास्त मुक्काम करणं नियमबाह्य होतं.) तसं केलं तर ' ओल्ड ख्रिश्चन 'ची मुलं निराश झालीच असती, शिवाय युरुग्वे एअर फोर्सचं बरंच आर्थिक नुकसान होणार होतं. म्हणून शेवटी वैमानिकांनी मार्सेलो पेरेझमार्फत सर्व उतारूंना एक वाजता विमानतळावर हजर राहायला सांगितलं.

त्याप्रमाणे सर्वजण तळावर दाखल झाले खरे; पण दोन्ही वैमानिक आणि नोकर किंवा अर्जेंटिनाचे अधिकारी यापैकी कोणाचाच पत्ता नव्हता. तेव्हा मुलं थट्टामस्करी करत, फोटो काढत किंवा नुसतंच इकडे तिकडे भटकण्यात वेळ काढू लागली. एकमेकांना काहीजण भीती दाखवत होते, ' आज शुक्रवार, तेरा तारीख; दिवस अशुभ आहे. ' तेवढ्यात फेरॅडस लागूरारासह ' मेंडोझा ' दारूच्या बऱ्याच बाटल्या घेऊन अवतीर्ण झाले. पुन्हा मुलांनी त्यांना चिडवायला सुरुवात केली. ' दारुडे !' ' स्मगलर्स !' कॅनेसा नेहमीच्या स्वरात गुरगुरला, ' पहा कसले वैमानिक आपल्या नशिबात आहेत!'

त्या गोंधळामुळे दोघंही बरेच अस्वस्थ झाले. अजूनही निघण्याचं निश्चित झालं नव्हतं; पण दक्षतेची उपाययोजना म्हणजे त्यांची असमर्थता समजली जाण्याचा संभव होता. त्याच वेळी एक विमान खाली उतरलं. ते बरंच जुनं होतं. त्यामुळे प्रचंड आवाज करत आणि धुराचे लोट सोडत ते अखेर थांबलं. त्याचा वैमानिक विमानतळाच्या इमारतीमधे शिरताच फेरॅडसनं त्याचा सल्ला घेतला.

तो नुकताच सॅन्टियागोहून आला होता. त्याच्या मताप्रमाणे अँडीजवर वादळी हवामान असलं तरी फेअरचाइल्डसारख्या अत्याधुनिक विमानाला प्रवास करण्यात कोणताच धोका नव्हता. उलट त्यानं असं सुचवलं की जुंकलच्या सरळ मार्गानं सॅंटियागोला जाण्यातही हरकत नाही. सुमारे १५० मैलांचं अंतर त्यामुळे कमी होणार होतं.

फेरॅडसनं निर्णय घेतला की निघायचं—जुंकलमार्गानं नाही पण सुरक्षित अशा प्लॅंकनमार्गामधून. तसं जाहीर झाल्यावर मुलांनी जोरजोरात आनंद व्यक्त केला. पासपोर्ट वगैरेची तपासणी होईपर्यंत थांबावं लागणार होतं, पण जायचं नक्की तर झालं !

मधल्या वेळात त्या जुन्या विमानानं पुन्हा उड्डाण केलं.तोच प्रचंड आवाज आणि धुराचे लोट. ' ओल्ड ख्रिश्चन'च्या दोन मुलांना दोन अर्जेंटिनाच्या मुली सोडायला आल्या होत्या. आदली रात्र त्यांनी एकत्र घालवली होती. एकजण म्हणाला, ' आत्ता आम्हाला कळलं, अर्जेंटिनामधली विमानं कशा प्रकारची आहेत ?'

' पण निदान ती अँडीज पार करू शकतात, ' त्यातली एक मुलगी तत्परतेनं म्हणाली, ' तुमच्या या विमानापेक्षा ती नक्कीच चांगली. '

## : ४ :

सहवैमानिक लागूरारानं फेअरचाइल्डचा ताबा घेतला. स्थानिक वेळ २–१८ ला विमानाचा प्रवास पुन्हा सुरू झाला. अर्जेंटिनाच्या बाजूकडील ' मालार्ग ' या गावावरून तो प्लॅंकन मार्गाकडे वळला. विमान १८००० फुटांवर चढल्यावर मध्यम गतीनं ते पुढे जाऊ लागलं.

खालची जमीन कोरडी ठणठणीत दिसत होती. उजवीकडे पर्वतावरील खडक आकाशाशी स्पर्धा करीत होते. तळ नापीक तर पर्वत नुसतेच खडकाळ. हिरवा रंग नावापुरता सुद्धा नव्हता. करड्या, पिंगट, पिवळसर खडकांवर वनस्पतींचा मागमूसही नव्हता. पश्चिमेकडून येणारे ढग शिखरांमुळे अडले जात : पाऊस अलीकडे पोचू शकतच नव्हता. सर्वत्र बर्फ आणि फक्त बर्फच. १३००० फुटांवर सदैवच, पण वर्षाच्या सध्याच्या दिवसांत कमी उंचीवरही ते पडत

असतं, पर्वतांच्या रेषा त्यामुळे वक्राकार होतात आणि दऱ्यांमधे शंभर शंभर फूट बर्फ साठतं.

फेअरचाइल्डला स्वयंचलित दिशादर्शक होता. दुपारी ३ वा. ८ मिनिटांनी विमानानं 'मालार्ग' टॉवरशी संपर्क साधला. तो नित्यक्रमच होता. मेंडोझा आणि सॅंटियागो यांच्या मधोमध 'हवाईमार्ग नियंत्रक टॉवर' होता. प्लॅंकनमार्गात तो येतो. बरोबर ३–२१ ला तोही ओलांडला. पर्वताकडे दृष्टी टाकताच लागूराराला बऱ्याच खाली ढगांची रांग दिसली. त्यांच्याशी काहीच कर्तव्य नव्हतं. समोर आकाश स्वच्छ होतं. बर्फाच्छादित शिखरंही दिसत होती. वाऱ्याचा वेग मात्र बराच वाढला होता, एवढा म्हणण्याजोगा बदल झाला. त्याचबरोबर विमान २१० ऐवजी १८० नॉट वेगानं धावू लागलं.

३–२१ ला लागूरारानं सॅंट्रियागो तळावर संदेश दिला की 'आम्ही प्लॅंकनवरून जात आहोत. सुमारे १०–१२ मिनिटांत क्युरिकोला पोचू.' क्युरिको हे अँडीजच्या पश्चिमेकडील चिलीमधलं छोटंसं गाव. तीनच मिनिटांनंतर पुन्हा सॅंटियागोला संदेश गेला की 'क्युरिकोवरून 'मायपू'कडे जात आहोत.' पूर्वीचा मार्ग बदलून विमान उत्तरेकडे नव्वद अंशात वळलं. सॅंटियागो टॉवरकडून १०,००० फुटांवर खाली यायला मान्यता मिळाली. तोपर्यंत 'प्युडाहेल्' विमानतळाच्या दिशेला फेअरचाइल्ड लागलं होतं. साडेतीन वाजता पुन्हा विमानाची पातळी तपासण्यात आली. त्यावरून लक्षात आलं की लागूरारान विमान आधीच ३००० फूट खाली उतरवलं होतं. त्या उंचीवर ते ढगात शिरलं आणि उडया मारत थरथरू लागलं. हवेच्या वेगवेगळया प्रवाहांचा त्यावर जबरदस्त परिणाम होत होता. लागूरारानं उतारूंच्या विभागातील दिव्याचं बटन दाबलं. त्याचा अर्थ सर्वांनी आपले पट्टे आवळावेत आणि धूम्रपान बंद करावं. फेरॅंडस नोकरानं आणून दिलेला चहा पीत बसला होता. उतारूंना दिलेल्या सूचनेप्रमाणे ते वागताहेत का नाही हे त्यानं नोकराला बघायला सांगितलं.

बाहेर सगळे प्रवासी आरामात होते. वातावरण सुट्टी लागल्यासारखं होतं. छोटया खिडक्यांमधून मुलं ढग आणि ढगांच्या फटीतून पर्वत दिसतो का ते उत्सुकतेनं पाहत होते. त्यांचा उत्साह अवर्णनीय होता. लोकांच्या डोक्यांवरून ते रग्बीचा चेंडू फेकत होते. काहीजण पत्त्यांमधे रमले होते. वैमानिकांच्या केबिनमधून बाहेर आल्यावर नोकरानं–रामरेझनं–मुलांना आपापल्या जागा पकडायला सांगितलं.

'पुढे हवा खराब आहे,' तो म्हणाला, 'विमानाला धक्के बसायची शक्यता आहे, पण बिलकुल काळजी करू नका. सॅंटियागोच्या टप्प्यात आपण आहोत. लवकरच तिथे पोचू.'

अजूनही उभ्या असलेल्या चार मुलांना जागेवर बसवून तोही साथीदारांसह पत्ते खेळू लागला.

दुसऱ्या प्रचंड ढगात विमान शिरल्याबर ते पुन्हा थडथडू लागलं. या वेळी मात्र प्रवाशांमधे खळबळ माजली. भीती लपवण्यासाठी एकदोन उसन्या अवसानाचे विनोद झाले. एका मुलानं मायक्रोफोनचा ताबा घेतला आणि तो म्हणाला, 'सभ्य स्त्री-पुरुषहो, पॅराशूट अडकवून तयार राहा. आपण पर्वतावर उतरणार आहोत.'

त्याच्या विनोदामुळे कोणाचीही करमणूक झाली नाही. कारण त्याच दरम्यान वाऱ्याच्या मोठ्या झोताबरोबर विमान शेकडो फूट दूर फेकलं गेलं. रॉबर्टो कॅनेसानं मागं वळून पाहिलं आणि 'सिनोरा निकोला'ला विचारलं, 'घाबरला नाही ना?' ती आपल्या नवऱ्या जवळ बसली होती.

'होय,' ती म्हणाली, 'मला खूप भीती वाटते.'

काही मुलं उगीचच गुणगुणायला लागली. कॅनेसानं, विशेष काहीच झालं नाही असं दाखवून, हातातला चेंडू डॉ. निकोलांकडे फेकला. त्यांनी तो पुन्हा परत टाकला.

युजेनिया पेरॅडो इतका वेळ पुस्तकात डोकं खुपसून बसली होती. तिनं वर बघितलं. खिडकीतून धुक्यासारखे पांढरे ढगच ढग; दुसरं काहीच दिसत नव्हतं. शेजारी बसलेल्या सुसानचा हात तिनं हातात घेतला. मागं अेबल आणि नॅन्दो चर्चेत मग्न होते. नॅन्दोनं तर अजून पट्टा देखील आवळला नव्हता. वादळाच्या दुसऱ्या तडाख्यात विमान आणखी शंभर फूट खाली ओढलं गेलं. मुलं किंचाळू लागली. एव्हाना विमान ढगांमधून बाहेर पडलं होतं. या वेळी खिडकीतून चिलीच्या बाजूकडील खोल पण हिरवीगार दरी दिसायला हवी होती, पण त्याऐवजी पर्वताच्या खडकाळ, बर्फ पसरलेल्या कडाच दिसू लागल्या. विमानाचे पंख तिथून अवघ्या दहा फुटांवर होते.

'विमान इतक्या जवळून नेहमी जातं?' एका मुलानं विचारलं.

'मला नाही वाटत,' त्याचा जोडीदार म्हणाला.

कित्येक प्रवाशांनी देवाचा धावा सुरू केला. काही जणांनी समोरच्या बैठकीच्या जागा घट्ट पकडल्या. सगळे विमान आदळण्याची धडधडत्या अंतःकरणानं वाट बघत होते. इंजिनांची घरघर चालू होती. फेअरचाइल्ड वर चढण्याच्या प्रयत्नात थडथडू लागलं. ते थोडं वर गेलंही. इतक्यात उजवा पंख पर्वतावर आपटून कानठळचा बसवणारा आवाज झाला. पंख तर लगेच तुटलाच; पण विमानाचा मागचा भागही तुटून पडला. मागे बसलेले तीन नोकर, खुर्च्यांसह तीन मुलं असे सहाजण हवेत भिरकावले गेले. डावा पंखही पुढच्याच क्षणाला मोडला आणि जमिनीवर पडण्यापूर्वी विमानाच्या सांगाड्याला जोरात घासला गेला.

मधल्या भागात राहिल्या भयव्याकुळ किंचाळचा अन् मदतीच्या हाका. पंख आणि शेपटीशिवाय तो भाग मूळच्या वेगामुळे खडकाळ पर्वतावरून पुढे जाऊ लागला. आश्चर्य म्हणजे त्याचे तुकडे न होता, जवळच सुरू होणाऱ्या दरीच्या उतरणीवर घसरत घसरत शेवटी खोल बर्फामधे विमान रुतलं.

जमिनीवर कोसळण्याचा वेग २०० नॉटच्या दरम्यान असूनही त्याच्या ठिकऱ्या उडाल्या नाहीत हे विशेष. मागची आणखी दोन मुलं बाहेर फेकली गेली. बाकीचे लोक मधल्या सांगाड्यात अडकले. आदळण्याच्या हिसक्यामुळे खुर्च्या तळापासून निसटून त्यांच्यामधे काहीजण अडकून बसले, काही चिरडले गेले. अँडीजवरील गोठवणारी हवा जोरात आत घुसली. अजूनही ज्यांची डोकी ठिकाणावर होती ते पुढच्या हादऱ्याची वाट पाहू लागले, खुर्चीचा धातू आणि प्लॅस्टिक अनेकांच्या शरीरात ठिकठिकाणी घुसलं होतं. हे लक्षात आल्यावर सुरक्षा-पट्टे सोडवून काही मुलं उभं राहण्याचा प्रयत्न करू लागली; पण त्यात फक्त झेर्बिनो यशस्वी झाला. खाली पाय रोवून त्यानं छताला हात दाबून धरले. तो ओरडू लागला, 'जीझस, जीझस; आम्हाला संकटातून सोडव.'

'कार्लिटस पेझ 'नं पहिला पंख तुटल्याबरोबरच प्रार्थना सुरू केली होती. त्याचे शेवटचे शब्द संपताच विमान थांबलं. सर्वत्र शांतता आणि स्तब्धता पसरली; पण क्षणभरच. हळूहळू तिथून जिवाच्या आकांतानं मारलेल्या किंचाळया, कण्हण्याचे आवाज आणि प्रार्थना सुरू होऊन एकच गोंधळ माजला.

विमान दरीच्या तोंडाशी घसरत जात असल्यामुळे कॅनेसा अशा समजुतीमध्ये होता की मृत्यू नजिक आलेला आहे. त्यानं प्रार्थना न करता विमानाचा वेग आणि ते खडकावर आपटण्याचा जोर यांचाच हिशेब सुरू केला; पण लगेच त्याच्या लक्षात आलं की विमान अजिबात हलत नव्हतं.

तो ओरडला, 'थांबलं, विमान थांबलं!' मागे वळून तिथल्या मुलाला त्यानं विचारलं, 'ऑल राइट?' तो मुलगा अजून धक्क्यामधून सावरला नव्हता. त्याला तसंच सोडून कॅनेसा त्याचा मित्र डॅनियलकडे वळला. डॅनियल ठीक होता. मग दोघांनी इतरांना मदत करायला सुरुवात केली. आधी त्यांना वाटलं की जखमी न झालेले तेच दोघं; पण हळुहळू एक एकजण उठायला सुरुवात झाली. मदतीसाठी हाका सगळ्या भागातून येत होत्या. प्रथम झेर्बिनो उठला, मागोमाग कॅप्टन मार्सेलो पेरेझ. पेरेझच्या चेहऱ्याला जखमा झाल्या होत्या आणि एक बाजू ठणकत होती; परंतु कॅप्टन या नात्यानं त्यानं तातडतोब अडकलेल्या लोकांच्या सुटकेची तयारी सुरू केली. वैद्यकीय विद्यार्थी, कॅनेसा आणि झेर्बिनो जखमी लोकांवर शक्य ते उपचार करू लागले.

विमान थांबल्यावरोबर पेट्रोलचा वास येत असल्यामुळे काही तरुण मुलांनी मागच्या उघड्या भागातून खाली उड्या टाकल्या. विमानाचा स्फोट होईल किंवा आग तरी लागेल अशी भीती त्यांना वाटली होती. वर्फात ते मांडीपर्यंत बुडाले. त्यातून बाहेर पडून 'बॉबी फ्रँकॉइस' म्हणाला, 'अखेर हे घडलंच!' पेझ त्याच्या मागोमाग वर आला.

सभोवती परिस्थिती अगदीच अनुकंपनीय होती. जवळपास बर्फाखेरीज दुसरं काही नव्हतं आणि दूरवर, तीन बाजूंना करड्या रंगाचे उभे पहाड. विमान उतारावर कलंडलेल्या स्थितीत अडकून पडलं होतं. थंडी अमर्याद होती. कित्येक मुलांच्या अंगावर फक्त साधे सदरेच होते. कोट थोड्याच जणांच्या अंगावर होते. शून्याखालच्या तपमानात आवश्यक असलेले कपडे कोणीच घातले नव्हते. काही सूटकेसेस दिसत होत्या. त्यात आणखी कपडे मिळण्याची शक्यता होती.

पर्वतावर हरवलेल्या सामानाच्या शोधात फिरत असताना काही मुलांना एक व्यक्ती दूरवर घसरताना दिसली. ती जसजशी जवळ येऊ लागली, तसं त्यांनी ओळखलं की तो 'कार्लस व्हॅलेटा' होता. मोठमोठ्यानं ओरडून त्याला मुलं आपल्या दिशेकडे बोलावू लागली. पण दुर्दैवानं त्याला ती दिसलीही नाहीत की त्यांचा आवाजही ऐकू आला नाही. दर पावलागणिक व्हॅलेटा वर्फात बुडत चालला होता. त्यानं वेगळीच दिशा धरली होती. पुन्हा वेड्यासारख्या प्रचंड हाका मारूनही त्याचं लक्ष वेधता आलं नाही. 'पेझ' आणि 'स्टॉर्म' या दोघांनी त्याच्या दिशेला जायचा प्रयत्नही करून पाहिला; पण ते जमलं नाही. बर्फावरून चालणं अशक्य होतं, चढाच्या दिशेनं तर त्याहून कठीण. असहाय्यपणे बघत बसण्याखेरीज दुसरा इलाज नव्हता. क्षणभर त्यांना वाटलं की व्हॅलेटानं विमानाची दिशा धरली; पण पुढच्याच क्षणी तो कोलमडला आणि खोल दरीत त्याचं शरीर कडेला आपटत आपटत खाली जाऊ लागलं. अखेर बर्फामधे तो अदृश्य झाला.

विमानात पाच-सात मुलांनी खुर्च्यांनी अडकलेल्या लोकांना सोडवण्याचे प्रयत्न सुरू केले. अपघातापेक्षा चिमटून गेल्यामुळे कित्येक जण जखमी झाले होते. पर्वतावरील विरळ हवेमुळे प्रत्येक कामाला दुप्पट शक्ती आणि प्रयत्न लागत होते. ज्यांना केवळ वरवर मामुली जखमा झाल्या होत्या ते अजूनही धक्क्यातून सावरले नव्हते.

जखमी लोक मोकळे झाले खरे; पण पुढे फारसं काहीच करता येण्यासारखं नव्हतं. दोन 'डॉक्टरांचं,' कॅनेसा अन् झेर्बिनो, शिक्षण अद्याप प्राथमिक अवस्थेत होतं. पैकी झेर्बिनोच्या पहिल्या वर्षातले आधीचे सहा महिने मानसशास्त्र आणि समाजशास्त्र शिकण्यातच गेले होते. कॅनेसाची दोन वर्षं होऊनही एकूण शिक्षणक्रमातला फक्त चतुर्थांश भाग पुरा झाला होता. तरीही आत्ताच्या परिस्थितीत त्यांच्यावर असलेली खास जबाबदारी लक्षात घेऊन त्यांनी मदतकार्य सुरू केलं.

कॅनेसा खाली वाकला आणि त्यानं एका अचेतन स्त्रीची तपासणी सुरू केली. ती युजेनिया पेरँडो होती. बिचारी केव्हाच ठार झाली होती. तिच्या शेजारी तिची मुलगी सुसान अर्धवट बेशुद्धीत पडली होती. ती जबर जखमी झाली होती. कपाळावरच्या जखमेतून भळभळा वाहणारं रक्त तिच्या एका डोळ्यावर साचलं होतं. कॅनेसानं ते पुसून काढलं. नंतर रिकाम्या जागेवर तिला व्यवस्थित झोपवलं.

जवळच एबल पडला होता. तोही खूपच जखमी होता. जखम डोक्यावर झाली होती. कॅनेसा त्याच्या जवळ जाताच, एबलनं त्याचा हात घट्ट पकडला. पुन्हा पुन्हा तो म्हणू लागला, 'कृपा करून मला सोडून जाऊ नकोस, प्रिय मित्रा.' इतरही अनेकांना मदतीची जरुरी होती, म्हणून कॅनेसा त्याला थोपटून तिकडे वळला. त्यानं झेर्बिनोला एबलकडे लक्ष द्यायला सांगितलं आणि स्वतः नॅन्दोची दखल घ्यायला गेला. नॅन्दो विमानाबाहेर फेकला गेला होता. त्याच्या चेहऱ्यावर बरेच ओरखाडे होते, शिवाय रक्तही. तो मेला असावा असंच वाटत होतं. कॅनेसानं नाडी तपासली. ती मंदपणे चालू होती. तो जिवंत होता खरा; पण फार काळ टिकाव धरील असं वाटत नव्हतं. त्यावर काहीच उपाय नसल्यामुळे नॅन्दो मेल्यात जमा होता.

अपघात होताक्षणी युजेनियाव्यतिरिक्त आणखी दोघं उतारू ठार झाले होते. ते होते डॉक्टर आणि सिनोरा निकोला. सामानाच्या विभागात दोघंही फेकले गेले आणि एकदमच मृत्युमुखी पडले.

मृत शरीरं तूर्त होती तिथेच ठेवून दोन 'डॉक्टर्स' जिवंत लोकांना काय मदत करता येईल ते पाहू लागले. मिळेल त्या कापडापासून त्यांनी बॅन्डेजं तयार केली; पण एकूण गरजेपेक्षा ती खूपच कमी पडली. एका मुलाचा, रॅफेलचा, उजवा पाय निकामी झाला होता. पोटरी सोलून निघून आतलं हाड दिसत होतं. ते मोडलंही होतं. त्याचे रक्तस्राव होणारे स्नायू जागच्या जागी बसवून एक पांढरा सदरा त्यावर बांधला.

'अेन्‌रिक्‌ प्लेटरो 'च्या पोटात तर स्टीलची नळी घुसली होती; पण त्याचा धीर ढासळू नये म्हणून मृदू आवाजात झेबिनोनं त्याला विश्वास दिला. 'अेनरिक्‌, तू अगदी चांगला दिसतोस.'

'असं म्हणतोस ?' तो म्हणाला. पोटातल्या नळीकडे बोट दाखवून तो म्हणाला, 'आणि याचं काय ?'

'त्याची काळजी करू नकोस, तू अगदी बळकट आहेस. समोरच्या खुर्चीवर हात दाबून उभा राहा.'

अेन्‌रिकनं तसं केल्यावर झेबिनो त्याच्या पुढ्यात खाली बसला, अन्‌ पोटातली नळी बाहेर ओढून काढली. ती बाहेर आली खरी, पण बरोबर आतड्याचा सहा इंची तुकडा घेऊनच.

पोटाकडे लक्ष जाताच तो खलास झाला, पण त्यानं काही तक्रार करायच्या आतच झेबिनो म्हणाला, 'हे बघ, अेन्‌रिक्‌; तुझी स्थिती वाईट आहे असं तुला वाटेल, पण तुझ्यापेक्षाही खूप लोक गंभीर जखमी झाले आहेत. तेव्हा धैर्य राख. स्वतःच सदऱ्यानं जखम नीट बांधून टाक. मी तिकडे नंतर बघीन.'

एक शब्दही न बोलता अेन्‌रिक्‌ सूचनेप्रमाणे वागला.

फर्नांडोचा एक पाय तुटून दूरवर पडला होता. अतिरिक्त रक्तस्रावामुळे त्याला मरण आलं. आणखी एक रुग्ण कमी झाला.

खूप जणांना पायालाच जखमा झाल्या होत्या. एकाचा पाय तीन ठिकाणी मोडला आणि त्याच्या छातीलाही जबर जखम झाली. सध्या तो बेशुद्ध पडला होता. शुद्धीवर असलेल्या-अेबल, सुसान पेरॅडो आणि मध्यमवयीन अनोळखी सिनोरा मेरियानी या-तिघांना वेदना सहन होत नव्हत्या. सिनोरा उखडलेल्या खुर्च्यांच्या ढिगाऱ्याखाली पाय मुडपलेल्या स्थितीमध्ये अडकून पडली होती. तिची अवस्था फारच अनुकंपनीय होती. तिला सोडवणं कठिण होतं. किंचाळ्या फोडून ती मदतीसाठी हाका मारत होती, पण खुर्च्या हालवणं हे मुलांच्या शक्तीबाहेरचं काम होतं.

विमानातील पाचवी स्त्री, लिलियाना मिथेलचा चेहेराही खरचटून निघाला होता, रक्ताळला होता; पण जखमा वरवरच्या होत्या. तिचा नवरा, जेव्हियर, पँकिटो अेबलचा आतेभाऊ, सुखरूप होता. मात्र अति उंचावरील जागेमुळे त्याला 'फ्ल्यू 'चा झटका आला. इतरांना मदत करायचं त्याच्या मनात फार होतं; पण त्याच्यात एक पाऊल टाकण्याइतकंही त्राण उरलं नव्हतं. अपघातामुळं खूप जणांनी हाय खाल्ली होती. 'पेड्रो अल्गोर्टा 'च्या डोक्यावर परिणाम झाला होता. तो खुर्च्या हलवण्यात मदत करीत होता; पण आपण कुठे आहोत आणि काय करतोय याचं भानच त्याला राहिलं नव्हतं. दुसऱ्या एकाच्या डोक्यावर कसला तरी आघात झाला होता. तो विमान सोडून पर्वत उतरण्याचे प्रयत्न एकसारखा करत राहिला.

दुपारी साडेतीनच्या सुमारास विमान कोसळलं होतं. ढगांमुळे प्रकाश आधीच मंदावला होता. त्यात चारच्या दरम्यान बर्फ पडू लागलं. आधी वर्षाव बेताचा होता पण हळूहळू त्याचा जोर वाढू लागला. मोठमोठे खडक अदृश्य होऊ लागले. तशातही पेरेझच्या सूचनेनुसार जखमी लोकांना बाहेर काढण्यात आलं. विमानाचा सांगाडा साफ करून वाटेतल्या खुर्च्या सरळ करायच्या होत्या. ही तात्पुरती उपाययोजना होती. फेअरचाइल्ड बेपत्ता झाल्याचं सॅन्टियागो विमानतळावर लक्षात आलं असणार आणि लवकरच मदत येणार अशा समजुतीमध्ये सगळे होते.

रेडिओवरून संदेश पाठवले तर सुटका-पथकाला ठावठिकाणा लागणं सोयीचं जाईल हे त्यांच्या लक्षात आलं. वैमानिकांच्या केबिनचा मार्ग खुर्च्यांमुळे बंद झाला होता म्हणून तिथे बाहेरून प्रवेश करायचं 'मॉको सॅबेला 'नं ठरवलं. त्या जागेतून कण्हण्याचे आवाज ऐकू येत होते.

बर्फावरून चालणं केवळ अशक्य होतं म्हणून त्यानं बैठकीच्या कुशनचा पाऊल टाकायला वापर केला. विमानाचं नाक चांगलंच ठेचलं होतं; पण वर चढून केबिनमध्ये डोकावताना काहीच अडचण आली नाही.

त्याच्या लक्षात आलं की दोन्ही वैमानिक खुर्चीत अडकून पडले होते. त्यांच्या छातीत विमानाची उपकरणं घुसली होती. फेरॅडस ठार झाला होता, पण लागूरारा शुद्धीवर होता. मॉकोला पाहून त्यानं मदतीची विनवणी केली. तशी शक्यता नव्हतीच. त्याचं शरीर हलवण्यात मॉकोला अपयश आलं. फक्त पाणी मागितल्यावर रुमालातून बर्फ आणून त्याच्या तोंडात तो घालू शकला. रेडिओशी झटापट करून पाहिली, पण तो निरुपयोगी झाला होता. इतरांमध्ये परत आल्यावर त्यांचं मनोधैर्य ढासळू नये म्हणून त्यानं खोटंच सांगितलं की सँटियागोला संदेश पोचला.

नंतर कॅनेसा अन्‌ झेबिनो मॉकोच्या पावलांवर पावलं टाकून पुढे केबिनपाशी गेले. लागूराराच्या छातीसमोरील उपकरण मागे लोटण्याचा त्यांनी खूप आटोकाट प्रयत्न केला, पण ते अर्धा इंचही मागे सरकलं नाही. त्याची खुर्चीही हलत नव्हती. फक्त पाठीमागची उशी काढल्यामुळे लागूराराच्या छातीवरचा दाब काहीसा कमी झाला.

दोघांची धडपड चालू असताना लागूरारा एकसारखा बडबडत होता, 'क्युरिको मागं पडलं, आपण क्युरिको मागं टाकलं.' शेवटी काहीच जमेना तेव्हा त्यानं दोघांकडे पिस्तुल मागितलं. त्याच्या पिशवीत ते ठेवलेलं होतं. पिशवी कुठंच दिसत नव्हती आणि जरी ती सापडली असती तरी त्याला पिस्तुल थोडंच द्यायचं होतं ? कॅथॉलिक्सना आत्महत्या मंजूर नसते. रेडिओ कसा सुरू करायचा एवढं कॅनेसानं विचारलं. लागूराराच्या सूचनेप्रमाणे बटणं फिरवून पाहिली; पण ट्रान्समीटर केव्हाच निकामी झाला होता. बिचाऱ्या वैमानिकाच्या घशाला शोष पडला होता. नाकातून रक्तही वाहत होतं. कितीही बर्फ खायला दिला तरी तहान मिटत नव्हती. तो फार काळचा सोबती नव्हता.

दोन्ही 'डॉक्टर्स' पुन्हा जखमी, दुःखी लोकांच्या दुनियेत मागे परतले. सामानाखालून सुटका झालेले प्रवासी बाहेर बर्फावर आडवे झाले होते. थोडीच मुलं, धडधाकट अन्‌ कामाला योग्य, विमानातील तळाची जागा मोकळी करण्यात गुंतली होती. प्रकाश कमी कमी होऊ लागला. सहा वाजता पुरता अंधार झाला. तपमान गोठणबिंदूच्याही खूप खाली गेलं. आता त्या दिवशी मदत येण्याची शक्यता नव्हती म्हणून जखमींना विमानात नेण्यात आलं. बचावलेले बत्तीस जण रात्रीला तोंड देण्यासाठी सिद्ध झाले. ◻

: ५ :

सरळ नीट उभं राहता येईल किंवा आडवं होता येईल अशी जागा आत नव्हती. सांगाडयाची मागची बाजू वेडीवाकडी झाली होती. डाव्या बाजूला सात, तर उजवीकडे फक्त चारच खिडक्या शिल्लक राहिल्या होत्या. पुढच्या केबिनपासून मागे पडलेल्या भगदाडापर्यंत वीस फूट अंतर होतं. त्यात पुन्हा खुर्च्या इतस्ततः विखुरल्या होत्या. रात्रीपर्यंत दरवाजालगतची जागाच फक्त मोकळी होऊ शकली. त्या ठिकाणी गंभीरपणे जखमी झालेल्यांना ठेवण्यात आलं. उदा. सुसान आणि नॅन्दो पेरॅडो, अेबल वगैरे. त्यांना साधारण पाय पसरून आडवं होता येत होतं खरं, परंतु थंडगार वारे आणि बर्फापासून पुरेसं संरक्षण मिळत नव्हतं. पेरेझनं 'रॉय हार्ले' नावाच्या मुलाची मदत घेऊन उघडया जागी तुटलेला पंख, सुटकेसेस आणि खुर्च्यांचे तुकडे उभारले. वारा इतका वेगवान होता की त्यांची भिंत एकसारखी कोसळू लागली.

पेरेझ, हार्ले आणि इतर जखमी न झालेली मुलं त्या जागी उभी राहून नव्या 'भिंती'ला संरक्षण देत होती. वैमानिकांनी मेंडोझामध्ये खरेदी केलेली दारू पीत ते थंडीपासून आपला बचाव करू पाहत होते. राहिलेले लोक खुर्च्या आणि मृत शरीरांमध्ये जिथे जागा मिळाली तिथे झोपले. सामानाची जागा— केबिनच्या अलीकडे— त्यातल्या त्यात उबदार होती. जास्तीत जास्त उतारू, लिलीयन मिथॉलसह, तिथे वेडयावाकडया स्थितीत पडून राहिले. दारूच्या बाटल्या तिथेही खूप पसरल्या होत्या. ती लिटरचे लिटर पोटात ढकलल्यावर मामुली ऊब निर्माण होत होती. अंगात अपुरे कपडे असलेल्यांचे सर्वात जास्त हाल झाले. एकमेकांचे हातपाय घासून ते उष्णता निर्माण करीत होते. इतक्यात कॅनेसाच्या सुपीक डोक्यातून नामी कल्पना निघाली. बैठकीवरील वेल्व्हेटचं कापड सहज ओढून घेण्यासारखं होतं. त्याचा पांघरूण म्हणून वापर करायचं ठरलं. शून्याखालच्या थंडीपुढे ते काहीच नव्हतं, पण अजिबात संरक्षण नसण्यापेक्षा खूप चांगलं.

थंडीपेक्षाही त्या रात्री असलेलं अतीव गोंधळाचं आणि उन्मादी वातावरण जास्त वाईट होतं. प्रत्येकाला आपल्याच जखमा सगळयात गंभीर वाटत होत्या. तसं तो इतरांना अट्टाहासानं पटवूनही देत होता. पाय मोडलेला एक मुलगा कोणीही जवळ आलं की किंचाळायला लागायचा, भरपूर शिव्या द्यायचा. लोक त्याला मुद्दाम त्रास देतात अशी त्याची समजूत होती. पण तो जेव्हा स्वतः तहान भागवण्यासाठी दरवाजापाशी गेला तेव्हा इतरांच्या जखमांची पर्वा न करता तुडवत गेला. पेरेझनं त्याला शांत करायचा खूप प्रयत्न केला. कृत्रिम भिंत कोसळली की रॉय हार्लेलाही झटके येत. त्याला संभाळण्याची जबाबदारी पेरेझवरच पडली.

रात्रीच्या अंधारात कण्हणे, विव्हळणे, ओरडणे, किंचाळणे या खेरीज दुसरं काहीएक ऐकू येत नव्हतं. सामानाच्या जागेत अजूनही लागूराचा आक्रोश ऐकू येत होता. 'आपण क्युरिको सोडलं.' 'मी क्युरिको मागे टाकलं.' पाण्यासाठी हाका मारून तो पिस्तूल देण्याची एकसारखा विनंती करीत होता.

सिनोरा मेरियानो अजूनही खुर्चीखाली अडकून पडली होती. तिचं रडणं असह्य होत होतं. शेवटी एकजण ओरडला. मुकाटयानं गप्प बस पाहू. इतरांच्या मानानं तुला काहीच झालेलं नाही.'

यानंतर तिच्या किंचाळया दुप्पट जोरात सुरू झाल्या. कोणी जवळ यायला लागला की ती ओरडायची, 'त्याला दूर न्या. त्याला मागे खेचा. तो मला ठार करणार आहे!'

अवघडलेल्या स्थितीमध्ये झोप कोणालाच येत नव्हती. सगळे त्यातल्यात्यात उबदार आणि मोकळी जागा शोधू पाहत होते.

पुढच्या भागातून 'पँको डेलगॅडो' उठला आणि दरवाजाकडे जात म्हणाला, 'दुकानात जाऊन मी कोको-कोला घेऊन येतो.'

'मग माझ्यासाठी बाटलीभर पाणी तरी घेऊन ये.' त्याचा मित्र पेझ म्हणाला.

त्यातूनही काही जणांना गुंगी आली, पण रात्र मोठी होती. जखमांना, मोडलेल्या अवयवांना धक्का लागला की मुलं एकामागोमाग एक ओरडत होती. त्यामुळे संत्रस्त झालेले लोक एकमेकांना शिव्यासुद्धा देत होते. सर्वांची दशा केविलवाणी झाली होती.

कपडयांच्या फटीतून वारा शरीराला झोंबत होता, म्हणून जागी असलेली मुलं एकमेकांना चिकटून बसली होती. दरवाजाजवळच्या मुलांचे अवयव थंडीमुळे बधिर झाले होते, गोठल्यासारखे वाटत होते. शुद्धीवर असलेले, एकमेकांचे हातपाय आणि बोटं घासून निदान रक्ताभिसरण चालू ठेवत होते. नॅन्दो आणि अेबल यांना तेसुद्धा करता येत नव्हतं. नॅन्दो तर जखमांमुळे आलेल्या ग्लानीत निपचित पडला होता. अेबल मदतीसाठी विनवणी करीत होता, 'थंडी किती आहे, कृपा करून मला मदत करा, प्लीज—' सुसानही आपल्या मेलेल्या आईला एकसारखी पुकारत होती— 'ममा ममा, आपण इथून निघून जाऊ. आपण आपल्या घरी जाऊ.' तिचं मन भटकत होतं, मधूनच ती अंगाई गीत गाई.

रात्र संपता संपत नव्हती. मधूनच झेबिनोला भास झाला की फटीतून उषःकालचा प्रकाश डोकावतोय. म्हणून त्यानं घडयाळाकडे नजर टाकली. तर रात्रीचे फक्त नऊ वाजले होते. थोडया वेळानं मधल्या भागातल्या लोकांना कसला तरी अनोळखी आवाज ऐकू आला. क्षणभर त्यांना वाटलं की बहुधा सुटका-पथक आलं असावं. पण लगेच गैरसमज दूरही झाला.

सुसान इंग्रजीमध्ये प्रार्थना म्हणत होती.

[ क्रमशः ]


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
व. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# राजमुकुटाची चोरी

प्रभाकर सोवनी

कर्नल पीटर ब्लड हा अगदी बेडर माणूस !

जन्माने तो आयरिश होता; पण त्याला साहस आणि संपत्ती या गोष्टी अत्यंत प्रिय होत्या. कसलाही धोका असला तरी हा पठ्ठ्या बेडरपणे पुढे घुसे. एकदा तर त्याने आपला सहकारी कॅप्टन मॅसन याला १५ सशस्त्र सैनिकांच्या हातून एकटचाने सोडवले होते.

पण कर्नल ब्लडचे नाव इतिहासात कायमचे दाखल होऊन बसले आहे ते म्हणजे 'इंग्लंडचा राजमुकुट चोरणारा धाडसी चोर !' म्हणून.

तीनशे वर्षांपूर्वीची कथा आहे. आपल्या इकडे छत्रपती शिवाजीमहाराज आपल्या राज्याच्या कक्षा वाढवीत होते. त्या वेळी इंग्लंडमध्ये दुसरा चार्ल्स राज्य करीत होता. त्याच्या कारकीर्दीतली ही गोष्ट !

१६७१ च्या वसंतऋतूत लंडन टॉवरच्या मार्टिन टॉवरमध्ये एक खेडूत–जोडपे राजमुकुट आणि इतर जडजवाहिर याकडे डोळे भरून एकटक पहात उभे होते. वेशावरून त्यातला पुरुष धार्मिक मठातला पाद्री वाटत होता. बायको बरीच अशक्त आणि थकलेली दिसत होती.

त्या वेळी राजमुकुट आणि इतर जडजवाहीर मार्टिन टॉवरमध्ये एका मोठ्या लोखंडी जाळीच्या कोठीत ठेवलेले असे आणि त्याच्या रक्षणासाठी टाल्बोट एटवर्ड्स् या पहारेकऱ्याची नेमणूक केलेली होती. एडवर्ड्स् कोठीच्या वरच्या मजल्यावर राहत असे आणि दिवसभर जडजवाहिराच्या कोठीवर पहारा ठेवणे हेच त्याचे मुख्य काम होते.

राजमुकुटाकडे टक लावून पहाणाऱ्या या जोडप्याकडे एडवर्डने एक दृष्टिक्षेप केला पण नंतर फारसे लक्ष दिले नाही. तेवढ्यात जोडप्यातील बाई 'अग बाई ग !' असे म्हणून मटकन् खाली बसली. तिच्या नवऱ्याने तिला सावरले. काय झाले म्हणून पहाण्यास एडवर्ड्स् तिथे गेला.

'महाराज, माझी बायको फार थकली आहे. तिला जरा चक्कर आली आहे. थोडे पाणी मिळेल का ?' त्या पाद्र्याने अत्यंत मृदु भाषेत विचारणा केली.

एडवर्ड्स लगेच आपल्या बायकोला हाक मारून पाणी मागवले. एडवर्ड्स्च्या बायकोने त्या खेडूत बाईची अवस्था पाहून दोघांनाही आपल्या घरी येऊन विश्रांती घ्यावयास भाग पाडले.

हा पाद्री म्हणजे कर्नल ब्लडच होता. राजमुकुट चोरण्याच्या योजनेतील १ ला टप्पा त्याच्या कल्पनेपेक्षाही यशस्वी झाला होता.

त्यानंतर १५ दिवसांनी पुन्हा हे पाद्री दांपत्य एडवर्ड्स्कडे आले. या वेळी पाद्रीणबाई खूपच ताजीतवानी दिसत होती. एडवर्ड्स् मंडळींनी केलेल्या मदतीबद्दल दोघांनी पुनःपुनः गोड शब्दात आभार मानले. इतकेच नव्हे तर पाद्रीणबाईने सौ. एडवर्ड्स्ना रेशमी हातमोज्यांची एक सुरेख जोडी भेट दिली.

यानंतर या दोन्ही जोडप्यांच्या गाठीभेटी वाढतच गेल्या आणि त्यांची अगदी घनिष्ठ मैत्री झाली. एडवर्ड्स्ला लग्नाच्या वयाची मुलगी होती. तिच्या विवाहासंबंधी एडवर्ड्स् खटपट करीत होता. त्यावर श्री. ब्लड याने 'आपला मुलगाही तरुण होतकरू असून सैन्यात आहे, त्यालाच ही मुलगी करून घेतो' असा प्रस्ताव मांडला. एडवर्ड्स्ला हे घरबसल्या इतके चांगले स्थळ चालून आलेले पाहून फारच आनंद झाला.

विवाहाचे पक्के ठरवण्यासाठी म्हणून एडवर्डसने ब्लडदांपत्याला भोजनाचे आमंत्रण दिले. ब्लडने आपले दोन घनिष्ठ मित्र या वाटाघाटीचे वेळी असावेत अशी इच्छा व्यक्त केल्यावरून एडवर्डसने त्यांनाही 'भोजनाला घेऊन या' म्हणून आग्रह केला.

भोजनाचे दिवशी ब्लड आपल्या दोन मित्रांसह संध्याकाळी जरा लवकरच हजर झाला. (भोजनाचा बेत रात्रीचा ठेवला होता.) आल्याआल्याच 'बायकोची तब्यत एकाएकी बिघडल्याने ती येऊ शकली नाही' याबद्दल त्याने दिलगिरी व्यक्त केली. गप्पाटप्पा सुरू झाल्या. सौ. एडवर्ड्स् आणि तिची मुलगी सैपाकपाण्याचे पहायला सैपाकघरात गेल्या. ब्लडने 'आपल्या मित्रांना राजमुकुट आणि जडजवाहीर पहावयाचे आहे, तरी तेवढी कृपा करावी' अशी एडवर्ड्स्ला गळ घातली.

एडवर्ड्स्ला त्यात काही वावगे वाटले नाही. नाही तरी भावी व्याह्याने केलेली ती विनंती होती. लगेच त्याने किल्ल्यांचा जुडगा घेतला व चौघेजण जडजवाहिरांच्या खोलीत आले. एडवर्डसने दार उघडून सर्वांना आत घेतले व पुन्हा दाराला कुलूप लावले. तेवढ्यात त्याच्या डोक्यावर एक जबरदस्त फटका बसला. खाली पडता पडता तो ओरडणार तोच त्याच्या तोंडावर हात दाबून धरून पाठोपाठ तोंडात बोळा कोंबण्यात आला. त्याचे हातपाय बांधून टाकण्यात येईपर्यंत त्याची शुद्ध गेलेली होती.

ब्लड आणि त्याचे साथीदार भराभर कामाला लागले. अकराशेव्या शतकापासून परंपरेने चालत आलेला 'एडवर्ड द कन्फेसर'

याचा हिरेजडित राजमुकुट ब्लडने उचलून पिशवीत टाकला आणि झग्याखाली कमरेच्या पट्ट्यात पिशवी खोचली. तोपर्यंत साथीदारांनी सोन्याचा राजगोलक हस्तगत केला होता आणि कानशीने राजदंडाचे पिशवीत बसतील असे छोटे तुकडे करण्याच्या प्रयत्नास ते लागले होते.

चोरीची योजना आतापर्यंत आखलेल्या आराखड्यानुसार अगदी सुसूत्र चालली होती; पण यापुढे मात्र घोटाळे घडून येण्यास सुरुवात झाली.

टालबोट एडवर्डस्‌चा मोठा मुलगा फ्लँडर्स येथे सैन्यात होता. तो अचानक रजा घेऊन घरी आला. घराशी पाहतो तो कोठीच्या दाराशी कोणी परका माणूस संशयास्पद स्थितीत उभा. काही तरी घोटाळा आहे हे लक्षात घेऊन तो वरच्या मजल्यावर धावला. तेथे आईकडून त्याला घरी आलेल्या पाहुण्यांची हकीकत समजली. ताबडतोब तो तसाच जिना उतरून जडजवाहिरांच्या कोठीत आला. तेथे पहातो तो एका कोपऱ्यात हातपाय बांधलेल्या स्थितीत वडील कण्हता आहेत आणि आलेले पाहुणे तसेच राजमुकुट व इतर जवाहीर गायब !

एडवर्डस्‌च्या मुलाने ताबडतोब आरडाओरड सुरू केली. आधीच ती अंधारी रात्र, त्यामुळे साऱ्या लंडन टॉवरभर साराच गोंधळ माजला. त्या गोंधळात खुद्द कर्नल ब्लडसुद्धा पाऱ्याच्या वेशात सामील होऊन "चोर–चोर ! पकडा ! तो पहा पळतोय !" असे ओरडत अंधाराकडे बोट दाखवीत पळत होता. या साऱ्या गोंधळात चोरटे सफाईने निसटले. सर्व लंडनभर राजमुकुट चोरीला गेल्याची वार्ता वाऱ्यासारखी पसरली.

पण या चोरांचे नशीब धड नव्हते. त्यामुळे अगदी योगायोगाने हे चोरटे 'सेंट कॅथेराइन वॉक' या रस्त्यावर घोड्यावर स्वार होण्याच्या तयारीत असतानाच पकडले गेले. त्यांच्या अंगझडतीत राजमुकुट आणि राजदंड ही राजचिन्हे जशीच्या तशी मिळाली. फक्त २–४ हिरे मात्र या गोंधळात कुठे तरी पडले ते कधीच उजेडात आले नाहीत.

त्या काळात किरकोळ चोरीसाठीसुद्धा हातपाय तोडणे किंवा प्रसंगी मृत्युदंड अशी गंभीर शिक्षा होई. आणि ही तर खुद्द राजमुकुटाची चोरी ! त्यामुळे हे सारे चोर फाशी लटकणार अशी साऱ्यांची खात्री होती. पण काही अघटितच घडले ! दुसऱ्या चार्लसने कर्नल ब्लडला बोलावून घेतले आणि त्याची जबानी घेऊन 'राजमुकुटाची चोरी' हा एक थट्टा करण्याचा, गंमतीचा प्रकार होता असे



त्याने जाहीर केले आणि कर्नल ब्लडला केवळ मुक्त केले एवढेच नव्हे तर त्याला वार्षिक ५०० पौंडांचा तनखाही चालू केला !

अर्थात यामुळे लोकांमध्ये अनेक तर्कवितर्क सुरू झाले. अनेकांच्या मताने या चोरीमागे खुद्द चार्लस राजाचाच हात होता. त्या वेळचा ऐतिहासिक काळ लक्षात घेतला म्हणजे या शंकेतील तथ्य जाणवते. दुसरा चार्लस् गादीवर येण्यापूर्वी पहिल्या चार्लसला क्रॉमवेलने मृत्युदंडाची शिक्षा देऊन कित्येक वर्षे निरंकुश सत्ता गाजवली होती. १६५८ मध्ये क्रॉमवेल मृत्यू पावल्यानंतर १८६० मध्ये दुसरा चार्लस् पुन्हा इंग्लंडमध्ये परत आला व त्याला गादीवर बसवण्यात आले होते.

पण आता राजाची पूर्वीची सर्व सत्ता नष्ट होऊन तो केवळ वार्षिक दीड लक्ष पौंड तनख्याचा धनी झाला होता. दुसऱ्या चार्लस्‌च्या उधळ्या वृत्तीमुळे त्याला हा तनखा नेहमीच अपुरा पडे आणि म्हणूनच राजमुकुटाची चोरी करवून पैसे उभे करण्याचा घाट त्याने घातला असावा असा संशय अनेकांच्या मनांत दृढमूल झाला.

काही जणांचा तर्क असा होता की, राजाने 'हा राजमुकुट व हिरे कोणीही चोरू शकणार नाही' अशी पैज मारली होती आणि हा पैजेचा विडा कर्नल ब्लडने उचलला होता. तो याच अटीवर की कदाचित त्यात ब्लड सापडलाच तर राजाने त्यास सोडवावे ! काहीही असो, पण कर्नल ब्लडला या चोरीच्या प्रयत्नाबद्दल कसलाही दंड न होता वार्षिक ५०० पौंडाचा तनखा सुरू झाला ही गोष्ट मात्र खरी !

त्यानंतर राजमुकुट आणि इतर जडजवाहीर मार्टिन टॉवरमधून हलवून वेकफील्ड टॉवरमध्ये ठेवले. आजही बंदुकीच्या गोळीलाही दाद देणार नाहीत अशा जाड काचेच्या पड्यामागे ठेवलेला हा हिरेजडित राजमुकुट, राजदंड आणि इतर जवाहीर पहावयास मिळते.

इंग्लंडच्या राजमुकुटाच्या चोरीची ही काहीशी जगावेगळी हकीकत वाचून अनेक वाचकांच्या डोक्यात काही तरी यासारख्याच ओळखीच्या घटनेची याद येऊ लागली असेल. २४ मे १९७१ रोजीची दिल्लीच्या स्टेट बँकेची ६० लक्ष रु. ची कहाणी वाचक अजून विसरले नसतील; पण वाचकहो, भलत्या शंकाकुशंका न काढणेच बरे नव्हे का ? कारण त्यातील मुख्य आरोपी श्री. नगरवाला हॉस्पिटलमध्ये 'हृदयविकाराने' मृत्यू पावला. या प्रकरणाची चौकशी करणारे कश्यप ग्रँट ट्रंक रोडवरील अपघातात ठार झाले. पोलिसतपासात पुरेसा पुरावा पुढे न आल्यामुळे स्टेट बँकेचे चीफ कॅशियर श्री. मल्होत्रा यांच्यावरील खटला काढून टाकला गेला आणि या प्रकरणावर पडदा पाडला. त्यामुळे आता अजूनही राजमुकुटाच्या चोरीसारखीच ही राजपेढीतील ( स्टेट बँक ) ६० लाखांची चोरी 'करण्यात' आली असे तर्कवितर्क करण्यात काय स्वारस्य ? श्री. मल्होत्रांना बँकेतून काढून टाकण्यात आले ही शिक्षा त्यांना पुरेशी आहे. नव्हे का ? ☐ ☐

पुस्तके

# पहाटपाणी

प्रा. सरोजिनी वैद्य यांचे
जीवन-वाङ्मयविषयक मुक्त चिंतन

वि. भा. देशपांडे

"फार वर्षापूर्वी एका पहाटे मी आणि आई आडाचे पाणी ओढण्यासाठी आडावर गेलो होतो. हवेत चांगलाच गारवा होता. मी हुडहुडत होते आणि भरलेला पोहरा वर घेता घेता आई मला म्हणाली होती, 'इतकी थंडी लागते आहे ना तुला, पण हे ताजे पाणी कसं उबदार आहे बघ. अग ऽ ह्या ताज्या पाण्याची चवसुद्धा वेगळीच असते.' हे आज का आठवले ? काल काही मी माझ्या बालपणाच्या गुंफेत शिरले नव्हते. काळाची एवढी उलटापालट करून पाहायचे मी ठरविले तरी कधी होते ? पण एवढे खरे की असे काही एखाद्या क्षणी आठवते, दिसते, ऐकू येते तेव्हा माझा तो सगळा दिवसच वेगळी चव बरोबर घेऊन येतो आणि जुन्या मळलेल्या, नव्या न मळलेल्या वाटा मी पुन्हा एकदा चालून येते. ...."

अशा नव्या-जुन्या वाटांचा प्रवास करता करता अनुभवांचे जे पाथेय सरोजिनी वैद्य यांनी जमवले, त्याचे दर्शन 'पहाटपाणी' मध्ये घडते. ललित-वैचारिक अशा सोळा निबंधांचा हा संग्रह. यातील लेख स्त्री, साधना, सत्यकथा या नियतकालिकांतून पूर्वी प्रसिद्ध झालेले. तरीही पुस्तकरूपाने ते आपल्याला ताजेपणाने भेटतात. आपण त्यांचा आस्वाद तितक्याच नवेपणाने घेऊ शकतो.

माणसांच्या जीवनात शब्दांना जितके महत्त्व असते, अर्थपूर्णता असते तितकेच एका क्षणी ते शब्द निरर्थकही वाटतात. हे सूत्र पकडून काही निबंध प्रकट झाले आहेत. 'कुतूहल' मध्ये आपण केलेला मौनाचा प्रयत्न कसा होता याचे वर्णन करता करता अबोल माणसाविषयीचे कुतूहल आपल्याला कसे निर्माण झाले, त्याचे माणसांच्या नमुन्यासह विवेचन आहे. अबोल माणसे लोकांच्या पोतीत फारशी अडकलेली नसतात हाही त्या कुतूहलाचा खास विशेष आहे, तर एका निबंधस्पर्धेच्या निमित्ताने आलेला अनुभव 'कवायत' मध्ये आहे. विशिष्ट विषयावर बहुतांश लोक एक गुळगुळीत अक्षरसमूह निर्माण करून शब्दांची कवायत कशी करतात, ती कवायत पाहून आपण बधिर किंवा यांत्रिक कसे होतो याचे मार्मिक वर्णन आहे. 'एक उलटापालट' मध्ये शब्दांचे महत्त्व सांगितले आहे तर 'ओळखीचा शब्द' मध्ये एक चिंतनपर असा विचार व्यक्तविला आहे, तो म्हणजे–'शब्दांतून सरळ सरळ सगळे सांगायची आणि सगळे जाणून घ्यायची शब्दजीवी लोकांची ही धडपड किती अपुरी आणि निरर्थक आहे हे ज्या क्षणी आपल्याला उमजते, त्या क्षणी फार असहाय्य वाटते हे खरे ! .... ज्या शब्दांचा जन्म दुसऱ्याला उत्कट, खरे, नेमके असे काही सांगण्याच्या भावनेतून झाला त्या शब्दाचा आज होत असलेला उपयोग किती वेगवेगळा आहे, हे मनात येऊन मन चक्रावून जाते.' या निबंधाची रचना नाट्यपूर्ण असून इष्ट परिणाम साधणारी आहे.

शाळेपासूनच आपले आणि गणिताचे कसे जुळले नाही हे मोठ्या गमतीने 'गणित' मध्ये सांगितले आहे. पुस्तकातले गणित कळले नाही तरी प्रापंचिक गणिताचा अर्थ कळला आहे हे सांगून, सामान्य व्यवहारापेक्षा भव्य, दिव्य, वेगळे, तरल आणि सुंदर असे काही तरी लांबवरचे त्यातून दिसायला हवे होते अशी गणिताकडून अपेक्षाही स्पष्ट केली आहे. लेखिकेचा आणि गणिताचा नातेसंबंध जुळला नसला तरी घरातील एखाद्या जुन्या वस्तूशी चिरसंबंध कसा जडला त्याचे अंतर्मुख करणारे वर्णन 'अर्थ' मध्ये पहावयास मिळते. वस्तूंच्या दर्शनाने-स्पर्शाने भावचक्र फिरत राहते आणि जाणवते की, 'वस्तू ही जणू त्या साऱ्या आयुष्याची प्रगत भाषा. प्रत्येकाला समजू शकणारी, खूप बोलणारी, सांगणारी मूर्त भाषा. आम्हीच तुम्हाला अर्थ देतो असे नाही. पुष्कळ अंशी आम्ही तुमच्या रूपातूनच प्रकट होतो. तुमचे-आमचे हे नाते जेव्हा संपते तेव्हा आम्हीही संपलेले असतो. तुम्ही आमचे मूर्त रूप आहात. जपायला हवे तुम्हाला-आमच्यासाठी. तर याच वस्तू आणि वास्तू जीवनाची साथसंगत कशी करतात याचे अधिक वर्णन 'सोबत' या निबंधात आहे. विषयाचा विस्तार करताना काहीसा पाल्हाळिक आणि म्हणून अस्ताव्यस्त झालेला निबंध. 'निर्वासित आणि अनिकेत' यामध्ये घराच्या संदर्भात सत्याचा आणि स्वप्नाचा विचार लेखिकेने मांडला आहे. तिच्या लक्षात आले आहे की, दगडविटांच्या भिंती आणि मातीचीच कौले असणारे सुंदर घरही सोन्याच्या कौलाइतकेच दुष्प्राप्य आहे. हे सांगता सांगताच जाणिवेने जगणाऱ्या कोणाही माणसाला अविरत अस्वस्थ करणारा एक विचार व्यक्त केला आहे–'आज मी माझ्या स्वतःच्या घरात नाही, स्वतःच्या समाजात नाही आणि समाजातील स्वतःच्या घरात असावे तशीही नाही. धड कुठेच नाही. मी म्हणजे येरझारा घालणारा एक निर्वासित आहे !

प्रत्यक्षातील एखाद्या अनुभवाची सांगड दुसऱ्या कोणत्या तरी समांतर गोष्टीशी घालून देण्याची सवय अनेकांच्या कशी अंगवळणी पडली आहे याचे काही मजेदार अनुभव 'मॅरेज बाय प्रॉक्सी' मध्ये कथन केले आहेत. ते अनुभव सांगताना लेखिकेला पडलेला प्रश्न म्हणजे भोवतालचे जग निखळ अशा आपल्या संवेदनांनी पाहायचा आपण का प्रयत्न करीत नाही ? असेच काही प्रश्न 'देवदास आणि शरदबाबू' या निबंधात उपस्थित केलेले आहेत. कादंबरीतील शेवटची वाक्ये कोणाची ? पारूची की आम्हा वाचकांची ? या प्रश्नांची उत्तरे शोधताना आम्हा दोघांची असेही लेखिकेने म्हटले आहे. हा निबंध 'देवदास'चे परीक्षण नाही.

वाङ्मयातील लेखकाची तद्रूपता आणि तटस्थता तपासून पाहता पाहता लेखनातील 'मी' चा शोध घेण्याचा यत्न या निबंधात आहे. या प्रश्नाचा अधिक विस्तार निबंधात असता तर आहे यापेक्षा अधिक स्पष्टता आली असती. असाच आणखी एक शोध दुष्यंतमग्न शकुंतलेला दुर्वासाची हाक ऐकू न आल्याने झालेल्या परिस्थितीचा 'दुर्वासाचे झाड' मध्ये घेतला आहे.

'अलीकडचे आणि पलीकडचे' यांचा तोंडावळा निबंधापेक्षा भावकथेला अधिक जवळचा आहे. यमूताई आणि बापूसाहेब यांच्या भावविश्वाचा वेध लेखिकेने घेतला आहे. एखादी गोष्ट इतकी जवळची होऊन बसते की ती जशी असेल तशी दिसायला तयारच नसते, त्यातूनच अनुभवलेली ही कथा आहे. केडगावच्या आश्रमाला दिलेल्या भेटीच्या संदर्भात 'मिटलेले दरवाजे' हा निबंध आहे. पंडिता रमाबाईंच्या कार्याचा अन्वयार्थ लावण्याचा लेखिकेचा प्रयत्न तर आहेच; पण त्याचबरोबर त्यांच्या शिष्या दयाबाई यांचेही व्यक्तिचित्र ठसठशीतपणे व्यक्त झाले आहे. वर्षानुवर्षे आश्रमातले आणि बाहेरचे जग समांतरपणे जात होते, जाऊ शकले होते, हे आश्रम पाहताना लेखिकेला जाणवलेच; पण त्याहीपेक्षा खंत होती ती पं. रमाबाईंचे माणसाला उन्नत करणारे स्वप्न या ठिकाणी कोठे आहे ? या गोष्टीची.

लक्ष्मीबाई टिळकांनी आपल्या आयुष्याच्या जुन्या खेळाचा डाव कसा मांडून पाहिला आणि दाखवला त्याचे यथार्थ वर्णन 'तिचे हासणे राहीना' यामध्ये तपशीलवार आले आहे. यातून लक्ष्मीबाईंचे एक स्वतंत्र व्यक्तिचित्र निर्माण झाले आहे. 'नीतिशतकाची सकाळ' हा या संग्रहातील सर्वोत्कृष्ट निबंध (की व्यक्तिचित्र) आहे. एका श्लोकाच्या निमित्ताने नीतिशतकाची आणि त्या निमित्ताने आपल्या आजोबांची झालेली आठवण हे या निबंधाचे केन्द्रस्थान आहे. या निबंधाच्या निमित्ताने लेखिकेने आपल्या आजोबांचे व्यक्तिमत्त्व जिवंत केले आहेच, पण त्याचबरोबर लहानशा सरूची सरोजिनीबाई होईस्तोवर आजोबांच्या संस्काराचा धागा कसा नकळत जपला गेला त्याचाही आलेख आहे. पिढ्यापिढ्यांतील मानसिक ताण, भावबंध, विचारांचे अंतर बदलत्या परिस्थितीत कसे होते, कसे आहे याचे सावध पण अलिप्त चित्रण या निबंधवजा व्यक्तिचित्रणात आहे. आजोबांचे व्यक्तिचित्र साकार होत असताना मराठीतील आणखीही काही दर्जेदार व्यक्तिचित्रे समोर येत होती आणि त्या वेळी असे वाटले की, 'नीतिशतकाची सकाळ' यातील आजोबांचे व्यक्तिचित्र मराठीतील अक्षरवाङ्मयात सहजपणाने समाविष्ट होऊ शकेल, इतकी त्याची वाङ्मयीन ताकद कसदार आहे.

तर असा हा सोळा ललित-वैचारिक निबंधांचा संग्रह वाचताना जाणवते की, सरोजिनीबाईंची जीवनविषयक आणि वाङ्मयविषयक जाणीव प्रगल्भ आहे. या निबंधांमध्ये आत्मपरता असली तरी त्याचे सवंग पातळीवरचे प्रदर्शन नाही. आत्मप्रौढीचा स्पर्श नाही. जीवनातील प्रसंग, घटना, व्यक्ती ही सारी निमित्ते आहेत. त्यांच्या आधाराने जीवनशोध-आनंदशोध होण्याची धडपड आहे. व्यामिश्र जीवनात काही अर्थ गवसलाच तर तो शब्दरूप करण्याची कांक्षा आहे. शब्दांचे अर्थत्व आणि निरर्थकत्व पूर्णपणे ध्यानी आल्याने आविष्कारात शब्दांचा अकारण सोस नाही. एखाद्या हितगुजाने किंवा मनोगताने प्रारंभ करून जीवनसत्याला स्पर्श करणारा लेखन-प्रवास आहे. संवेदनेने, जाणिवेने जगताना जे भावले ते एरवीच्या स्वभावानुसार मिताक्षरांतून प्रकट झाले. म्हणजेच ही लेखनरीती आशयापासून, व्यक्तित्वापासून अलग न राहता ती त्यांचा एक भाग बनली आहे हे प्रत्येक घाटदार निबंधातून व्यक्त झालेले आपल्याला दिसेल. या घाटदार निबंधांना अनुभवांची-विचारांची आंतरिक संगती आहे, लय आहे हेही सहजपणाने लक्षात येते.

व्यक्तिगत जीवन, कला-वाङ्मयविषयक जाणीव या परिघात सर्व निबंधांचा आशय सामान्यतः व्यक्त होत असला, तरी त्यांतील अनुभवांचे कसदारपण, सामाजिकतेचा स्पर्श, अनुभवांचा तळ शोधू पाहणारी शब्दकळा इत्यादी गुणांमुळे असे वाटते की, मालतीबाई बेडेकर, इरावती कर्वे, दुर्गा भागवत यांच्या तोलामोलाचे वैचारिक लेखन सरोजिनीबाईंनी केले आहे. केवळ ललितनिबंधसंग्रहांची मराठीत वाण नाही; पण ललित-वैचारिक पातळीवरचे, आपल्या अनुभवांशी-विचारांशी प्रामाणिक असलेले लेखन दुर्मिळ आहे. असे दुर्मिळ लेखन सर्वांना सारख्याच पातळीवर समाधानकारक वाटेल असे नाही. त्याबद्दल मतभेद जरूर संभवतील! असे लेखन लेखकाचे व्यक्तित्व तर विकसित करीत असतेच, पण वाचक म्हणून आपल्यालाही अनुभव-समृद्ध करीत असते. अशा दुर्मिळ लेखनामध्येच 'पहाटपाणी' हा संग्रह वाचनीय आणि स्मरणीय. □

**पहाटपाणी**
सौ. सरोजिनी वैद्य
सुपर्ण प्रकाशन, पुणे
किंमत ८ रुपये


बॉम्बे डाईंग
एकमेव वितरक
परांपे
डेक्कन जिमखाना, ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार
स्वस्त दरात
बेल बॉटम पिसेस
कुडता पिसेस

# मी पुस्तकांवर मनापासून प्रेम करतो....

पुणे येथील फिनिक्स वाचनालयाचे श्री. पोंडा यांची एका वाचकाने घेतलेली मुलाखत

: आपण पुस्तकावर इतके प्रेम का करता ?

: याची प्रामुख्याने तीन कारणे आहेत.

१. विचार मांडण्यासाठी पुस्तकासारखे दुसरे माध्यम नाही. वर्तमानपत्रात व मासिकातसुद्धा विचार मांडता येतात; परंतु ती दीर्घकाळ टिकविता येत नाहीत व वाचण्यालासुद्धा पुस्तकाइतकी सोयिस्कर नसतात.

२. दुसरे कारण असे की, पुस्तके आता नाश होण्याच्या मार्गावर आहेत. सुमारे ५० ते १०० वर्षांत त्यांच्या सध्याच्या स्वरूपाचे उत्पादन थांबेल. टेलिव्हिजन, रेडिओ, सिनेमा, हॉटेल अशा गोष्टी हळूहळू पुस्तकांची जागा घेऊ पहात आहेत. टाइम्स ऑफ इंडियाच्या परवाच्याच स्तंभलेखनात पुस्तकाच्या आलेल्या या अवकळेला एक गंभीर सांस्कृतिक शोकांतिका (Profound Cultural Tragedy) म्हटले आहे. जीवनातले तणाव आणि दबाव गणिताच्या पटीत नाहीत पण भूमितीच्या पटीत वाढतील आणि पुस्तके ही तणाव आणि दबावाच्या वातावरणात वाचण्याची वस्तू आहे काय ? साहजिकच कोणत्याही वस्तूचे रूप एकदम पालटण्याच्या मार्गावर असले किंवा ती वस्तू नाहीशी होणार असेल तर त्याच्याबद्दल आपल्याला जास्त जिव्हाळा वाटतो.

३. तिसरे कारण कदाचित हेही असू शकेल की मनुष्यप्रेमास मी पारखा झालो असेन.

: पुस्तकाचे स्वरूप पालटेल म्हणजे कसे होईल ?

: म्हणजे 'मायक्रोफिल्म'च्या धरतीवर कदाचित ती बाजारात असतील. असेही कुठे वाचल्याचे आठवते की, Talking Books निघतील. म्हणजे टेपरेकॉर्डरसारखी. यांचा आकार अगदीच लहान असल्यामुळे ती 'स्टोअर' करायला फारच कमी जागा लागते व ती मास प्रोडयूस व्हायला लागली की किंमतीही खाली येतील.

: आपल्या वाचनालयाचे सर्वांत मोठे काम कोठले ?

: वाचन. ह्या तऱ्हेची लायब्ररी चालविण्यासाठी रोज खंड न पडता ५ ते ६ तास वाचन लागते.

: पुस्तकाचे असे हे भवितव्य आपल्याला माहिती असून आपण यात इतके पैसे का गुंतवता ?

: एक तर ज्याच्यावर माझा उदरनिर्वाह होतो तो व्यवसाय बंद कसा करणार ? दुसरे म्हणजे आहेत त्या वर्गणीदारांना त्यांच्या पैशाचा योग्य मोबदला देणे भाग आहे. तिसरे कारण म्हणजे Compulsive need. असाही कदाचित एक दिवस उजाडेल की पुस्तके दुर्लभ झाल्यावर आहेत ती पुस्तके मौल्यवान होतील.

: पुस्तकाच्या व इतर भवितव्याबाबत एवढे निराश का ?

: एखाद्या कलाकाराने आपली सर्व शक्ती खर्च करून एखादी उत्तम कृती करावी त्याप्रमाणे माझे सर्वस्व मी या वाचनालयाला वाहिले आहे. आपण जर Irving Stone चे 'Lust for Life' वाचले असेल तर त्याची आपल्याला कल्पना येईल. ह्यातल्या व्हिन्सेंट व्हान खोक या चित्रकाराने आपल्या देहाच्या मेणबत्तीरूपी देहाची दोन्ही टोके जाळून उत्कृष्ट चित्रे तयार केली. अर्थात त्याच्या मानाने माझे वाचनालय काहीच नाही; पण फक्त साम्य आहे ते हे की आपले सर्व काही पणास लावणे. शेवटी तो जसा दमतो तसा मीही दमलो आहे.

: आपले आवडते लेखक कोणते ?

: स्टिफान झ्वाईग (Bewore of Pity), आयर्विंग स्टोन (Lust For Life), सीगमंड–फ्रॉईड, आर. डी. लेंज (The Bird of Parodise and Politics of Experience), डॉरिस लेसिंग (Descent into Hell) अल्बेर कामु (Outsider), जेक्वी मोनो (Chance of Necessity) (Jacques Monod), साम्युअल बेके (Waiting for Godol) (Backett), टाइल हार्ड डी शार्डी (Chordin), (The Phenomenon of Man), बी. एफ. स्किनर (Beyond Freedom & Dignity.)

ह्यापैकी झ्वाईगचे Bewore of Pity मधील वादळाचे वर्णन व त्या लंगडया मुलीच्या प्रेमात पडल्याची भावना या दोन्ही गोष्टी इतक्या हळुवारपणे टिपल्या आहेत की, त्यांनी मन हेलावून जाते. Lust for Life मधील व्हिन्सेंट माया नावाच्या बाईशी झोपतो त्याचे काल्पनिक वर्णन म्हणजे एक काव्यच होय. अमेरिकेत एक अलीकडे Behavioural Science निघाले आहे त्याला Ethology म्हणतात. स्कीनर आणि कॉनरेड लॅरेन्झ त्यातले अग्रगण्य समजले जातात. स्कीनरचे म्हणणे असे की, मनुष्य हा ५०% heredity ने व ४९½% भोवतालच्या परिस्थितीने जखडलेला असून त्यात free will चा फारसा उपयोग होत नाही. लॅरेन्झने मनुष्याच्या aggresive instinct वर संशोधन केले आहे.

: एवढी serious पुस्तके आपल्या वाचनालयात वाचली जातात का ?

: फारशी नाहीत; परंतु ज्या पुस्तकात दोन पैसे मिळतात त्यातूनच मी असली पुस्तके खरेदी करतो. येथे परत Compulsive need आलीच. कित्येक वेळा काही काही दुकानात तर इतके चांगले पुस्तक डोळ्यांसमोर दिसते; परंतु Budget मुळे ते न घेता Demand मध्ये असलेलेच पुस्तक घेऊन जड पावलाने बाहेर जावे लागते. जेव्हा परत कधी तेच पुस्तक घेण्यासाठी खिशात पैसे खेळत असतात तेव्हा ते पुस्तक परत कधीच मिळत नाही किंवा बऱ्याच काळानंतर मिळते.

: आपण पब्लिसिटीमागे असता असे ऐकतो.

: ते धादांत खोटे आहे. पुस्तके खरेदी करण्यासाठी व आहेत त्या

पुस्तकांची निगा राखण्यासाठी मला अफाट पैसे खर्च करावे लागतात. ते मिळविण्यासाठी 'पब्लिसिटी'ची गरज असते व त्यासाठी मला प्रभातचे श्री. सरदेशमुख, ना. सी. फडके, वसंत शांताराम देसाई, ग वा. बेहेरे व श्री. मुणगेकर व जयंतराव टिळक यांनी बरीच मदत केली; परंतु माझ्या वर सांगितलेल्या Compulsive need मुळे मी नेहमीच कडका असतो!

: कधी कधी वाचकांशी आपली कडाक्याची भांडणे होतात असे ऐकतो.

: ते खरे आहे. एवढे सर्व पणास लावून केलेल्या वाचनाबद्दल तो अनादराने उद्‌गार काढतो किंवा द्रव्याच्या जोरावर उद्धटपणाने वागतो तेव्हा साहजिकच मनाला फार उद्वेग होतो. वैफल्य वाटते. असल्या वाचकांशी भांडलो असेन. जे माझ्याशी नीट वागले आहेत त्यांच्याशी माझे कधीच भांडण झाले नाही. असे किती तरी वर्गणीदार माझ्याकडे १५ वर्षांपासून टिकून आहेत.

: आपल्या पुढील योजना काय आहेत?

: योजना बऱ्याच होत्या; परंतु त्या सर्व चलनफुगवटा व भाववाढीमुळे सोडाव्या लागल्या. तसा निराशावादी असलो तरी स्वप्नाळू वृत्तीचा आहे. योजनांपेक्षा स्वप्ने ही अशी आहेत. वाचनालयाची एक छोटीशी वास्तु असावी. प्लॅस्टिक वेल्डिंग मशीन घेऊन पुस्तकाला १००% संरक्षण मिळेल असे प्लॅस्टिक कव्हर डिझाइन करावे. एखादा क्वालिफाइड लायब्रेरिअन हाताखाली ठेवून कात्रणाचे व पुस्तकाचे शास्त्रोक्तरीत्या वर्गीकरण करावे व त्याच्या शास्त्रोक्त ज्ञानाचा व माझ्या स्वप्नाळू वृत्तीचा सुरेख संगम करावा. पुस्तकांस धुळीपासून संरक्षण मिळावे म्हणून वाचनालय वातानुकूल करावे. ज्यांना आमची वर्गणी परवडत नाही पण ज्यांना खरोखरच चांगल्या साहित्याची आवड आहे त्यांना विनामूल्य किंवा अल्पशा दरात वाचावयास देणे. पुस्तके कशी हाताळावी त्यासाठी डझनेक मोठे झकास फोटो लावावेत व विनोदी चित्रे व छापील लेबल्स प्रत्येक पुस्तकात लावावीत and so on and so forth कदाचित ती स्वप्नेच राहतील. पण असाच पुढे जात राहीन.

: आपण ज्या विशिष्ट पद्धतीने पुस्तकबांधणी व प्लॅस्टिक वेष्टण घालतो त्याचा खर्च किती येतो?

: रु. ९ ते १० प्रत्येक पुस्तकामागे येत असेल. हे काम फार चेंगट व वेळ खाणारे आहे. त्यामुळे बाइंडर्सना प्रत्येक पुस्तकामागे २॥-३ रु. नुसती मजुरी देतो. त्याशिवाय पुठ्ठा, भारी क्वालिटीचे रेग्झीन, सेलोफेन टेप, hand made कागद, दोरा, तीन चार प्रकारचे भारी अ‍ॅडहेसिव्ह प्लॅस्टिक (0 30 mm चे जाड) वगैरे बरेच सामान लागते. हे सर्व बाइंडिंग आम्ही यंत्राशिवाय करतो. फक्त प्रेसिंग मशीन तेवढेच वापरतो.

: आपले चोरीचे शिक्केही तऱ्हेवाईक आहेत.

: असू देत. पण त्यामुळे जर आमची पुस्तके कमी प्रमाणात गहाळ होत आहेत तर काय हरकत आहे? असं कुणीच करत नाही तर ते मी कां करू हे मला मान्य नाही. काही वर्षांपूर्वी माझ्या कर्मचाऱ्यांनी बरीच पुस्तके चोरली होती तेव्हापासून मी हे शिक्के मारतो.

: आपल्याकडे कुणी नवीन वाचनालय उघडण्यासाठी सल्ला मागायला आला तर आपण काय सांगाल?

: सरळ लाल कंदील दाखवीन.

: आपल्या वाचनालयाचा वर्गणीदार होताना कोणाची तरी ओळख लागते असे ऐकले आहे.

: बहुतांशी ते खरे आहे. पुस्तक वाचनालयात परत आणून न देणे, वर्गणी बुडवणे, बाजारात पुस्तक उपलब्ध नाही म्हणून ते वाचनालयातून आणणे आणि हरवले आहे, वर पैसे तर भरतो आहे, अशी भूमिका घेणारे, रोजावर पुस्तक नेऊन पुष्कळ दिवस झाले तर पुस्तकाच्या किमतीपेक्षा तुमचा दर जास्त होत आहे असे सांगणारे, अशा अनेक प्रकारांना तोंड द्यावे लागते. एखाद्या पुस्तकाच्या किमतीपेक्षा जास्त पैसे कधी मिळतातही; परंतु अशी शेकडो पुस्तके असतात की ज्यांची झीज फक्त वाचनालयालाच सोसावी लागते. हे सर्व त्या सुशिक्षित वाचकांना कसे कळत नाही त्याचे आश्चर्य वाटते; पण एकंदरीत आमचे वर्गणीदार फारच चांगले आहेत.

: आपण मराठी पुस्तकांपेक्षा इंग्रजी पुस्तकांचीच खरेदी जास्त करता असे म्हणतात.

: ते खरे नाही. पुस्तके मी मेरिटवर घेतो. ज्या पुस्तकात नवीन अनुभव व Originality सापडते ती पुस्तके मी घेतो. मग ते मराठी असो वा इंग्रजी.

: आपल्या वाचनालयात गंभीर विषयाच्या पुस्तकांबरोबर विनोदी पुस्तके आहेत का?

: आहेत. इंग्रजीमध्ये वुडहाउस, हेन्री सेसील, थोर्न स्मिथ, आर्ट बुकवाल्ड, जेम्स थर्बर, जेरोम के जेरोम (थी मेन इन् ए बोटवाला), चुटके, व्यंगचित्रे व मराठी भाषेत तर सर्व विनोदी लेखकांची पुस्तके आहेत; परंतु गंगाधर गाडगीळ यांनी म्हटलं आहे की, विनोदी वाङ्‌मय हे काही श्रेष्ठ वाङ्‌मय नाही. तेच विधान सकाळ १६।५।७५ मधील कात्रण मी त्यांच्या "बंडू" या पुस्तकाला लावून टाकले. जी पुस्तके वाचून आपण अंतर्मुख होतो व ज्या पुस्तकांचा impact आपल्या मनावर एवढ्या जोराने बसतो की थोडा वेळ आपण आपले अस्तित्वच विसरून जातो हेच खरे वाङ्‌मय. तीच खरी पुस्तके.

: आपल्या व्यवसायाबद्दल आपणास काही सांगावयाचे आहे काय?

: थोड्या दिवसांपूर्वी महाराष्ट्र टाइम्समध्ये 'मौज'चे वि. पु. भागवत यांचा 'पुस्तकांचा दुष्काळ' हा लेख वाचला. प्रकाशकाचा काय किंवा ग्रंथालयाचा काय शेवटी वाचक हाच आश्रयदाता असतो. जेथे पुस्तकांच्या अस्तित्वालाच भय आहे तेथे ग्रंथालये व प्रकाशक हे दोन्ही गोत्यात येणार. यासाठी वि. पु. भागवतांनी प्रकाशकासाठी सुचविलेले अनुदान योग्यच वाटले. त्यावर रमेश मंत्र्यांसारख्या ख्यातनाम व चांगल्या लेखकाने इतकी प्रखर टीका करावी याचे आश्चर्य वाटले. पुस्तके वाचण्याचा ग्रंथालये, प्रकाशक व लेखक यांनी एकत्र येऊन तोडगा काढावा.

काही व्यवसाय असे असतात की, त्यांना प्रतिकूल परिस्थितीत ग्रँट मिळाल्याशिवाय फारसे काही करता येत नाही. वाचनालये, प्रकाशक, रुग्णालये त्यापैकीच होत.

□ □

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २६-७-७५ ते १-८-७५

**मेष : व्यक्तिमत्त्व आकर्षक बनेल**

आज आघाडीवर जी माणसे आहेत त्यात मेषराशीच्या व्यक्तींना अग्रस्थान आहे. चौथा शनि मन:स्थिती खळबळून टाकणार असला तरी अजूनही तुमच्यावर मंगळाची सावली आहे. त्यामुळे कुणीही तुमच्याकडे डोळा वर करून पाहाणार नाही. तुमचे व्यक्तिमत्त्व आकर्षक बनणार आहे. या वेळी तुमचा जर नोकरीचा अगर इतर कोणताही इंटरव्ह्यु असेल तर त्यात यश मिळणार आहे. कृषिखाते, इंजिनिअरिंग, उद्योग, खाणी यात नोकरी मिळेल. चालू नोकरीत तुमचे सारे जीवनच पालटून जाईल. मंगळवार हा तुमचा शुभकारक दिवस असतो. या दिवशी कोणत्याहि कामात यश मिळेल. सोमवार ते गुरुवार सरकारी कामाला गती येईल. जवळचा प्रवास घडेल. महिलांना नोकरीत बढती मिळेल. मन उत्साही राहील.

**वृषभ : नव्या योजनांची स्फूर्ति**

तुम्ही साडेसातीच्या त्रासातून मुक्त झाल्यापासून तुमची अनेक आघाडींवर प्रगतीकारक घोडदौड चालू झाली आहे. या आठवड्यात त्याचा अधिक अनुकूल अनुभव तुम्हाला येऊ लागेल. शुक्रवारी नव्या वाहनखरेदीचे बोलणे होईल. तुमचा त्यात फायदा होईल. रविवार ते बुधवार कलाक्षेत्रात प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला जर लेखनाची आवड असेल तर तुम्हाला पुढे येण्याची संधी मिळणार आहे. साडेसातीमुळे तुमची जी अनेक कामे रेंगाळून राहिली होती ती आता गती घेऊ लागतील. नोकरीत तुमचे महत्त्व वाढणार आहे. नवी जबाबदारी तुमच्यावर सोपवण्यात येऊन तुमच्या गुणांना वाव मिळेल. बेकारांना उत्साह वाटावा अशी घटना घडेल. स्त्रीकडून धनलाभ होऊ शकेल. महिलांनी मन लेखनवाचनात गुंतवावे. गायिकांना नवी संधी मिळेल.

**मिथुन : स्थित्यंतर घडेल**

हा आठवडा तसा वाईट नाही. परंतु पूर्वीसारखे बेसावध राहून चालणार नाही. तुमची तब्येत आधीच नाजूक आहे. तुम्ही भावनेच्या आहारी देखील लवकर जाता ते सारे टाळावयास हवे. विवेक ठेवून वागावयास हवे. तुमचे आर्थिक नुकसान फारसे होणार नाही. पण तुमचा दुय्यम व्यवसायाची असो की नोकरीसंबंधी असो जी कामे सरळ चालू होती ती रेंगाळत राहिली तर आश्चर्य वाटू नये. देण्याघेण्यासंबंधीचे कोर्टकचेरीतील तंटे लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. गरजेसाठी लागणारा पैसा कमी पडणार नाही. पण मिळणारा पैसा चटकन हाती येईलच असे मात्र नाही. भलत्या अपेक्षा, न झेपणाऱ्या महत्त्वाकांक्षा उगाच घोळवीत बसू नका. मंगळवार चांगला दिवस आहे. महिलांना समाजसेवेत स्वत:ला गुंतवून घेता येईल. नोकरीत मात्र जपून राहावे.

**कर्क : तुमची शान वाढेल**

ज्या संधीची तुम्ही आजपर्यंत आतुरतेने वाट पाहत होता ती संधी आता तुम्हाला इतक्या सहजपणे मिळणार आहे की तुम्ही स्वत:च आश्चर्यचकित होऊन जाल. कारण आता तुमच्या चंद्राच्या सहवासात आलेला शनी तुमची प्रतिष्ठा, तुमचे व्यक्तिमत्त्व व तुमचा दरारा निर्माण करणार आहे. हा अनुभव विशेष नोकरीच्या बाबतीत येणार आहे. नोकरीत इंटरव्ह्यू होऊनही तुम्हास अद्यापपर्यंत नोकरी मिळाली नसेल तर ती या वेळी मिळू शकेल. शनिवार ते बुधवारी तब्येत सुधारू लागेल. प्रतिष्ठा वाढणाऱ्या घटना घडतील. आर्थिक स्थिती सुधारेल. लॉटरीत बक्षीस मिळण्याची शक्यता. महिलांना राजकारणात व नोकरीत महत्त्वाचे स्थान मिळेल. सोमवारचा उपवास लाभदायक होईल.

**सिंह : व्यवहारात दक्ष राहा**

शनीमहाराज एकदा नाखूष झाले की त्यांना शरण गेल्याखेरीज मनुष्याला गत्यंतर नसते. मित्र हो, तुम्हाला आता साडेसाती सुरू झाली आहे. होत्याचे नव्हते व नव्हत्याचे होते हाच शनीमहाराजांचा फटका असतो. तुम्ही रोज रुईच्या पानांची माळ व तेल मारुतीला वाहा. तुमचे मानसिक सामर्थ्य वाढायला त्यामुळे मदत होईल. तुम्ही सध्या तरी राजकारणात अजिबात भाग घेऊ नका यशापेक्षा माघारच पदरात पडणार आहे. तुमचे शत्रू तुमच्याविरुद्ध कारवाया करू लागतील. अर्थात त्यांचे काही चालणार नाही ही गोष्ट वेगळी. पैशाचे प्रत्यक्ष व्यवहार ज्यांच्याकडे आहेत त्या नोकरदारांनी अतिशय काळजी घ्यावी. उसने पैसे देणे व कर्ज काढणे टाळा. महिलांनी बोलताना जिभेवर नियंत्रण ठेवावे. नोकरीत याची अधिक काळजी घ्यावी. अनावश्यक पत्रव्यवहार टाळा.

**कन्या : संपत्तीचे वरदान**

सध्या ज्या भाग्यवान व्यक्ती भविष्याच्या रंगमंचावर आहेत त्यात कन्या रास ही विशेष आघाडीवर आहे. नोकरीत त्रासाशिवाय दुसरे काही पदरात पडत नाही व नोकरीशिवाय गत्यंतर नाही अशी एकंदरीत तुमच्या मनाची धारणा आहे. म्हणूनच मित्र हो, नोकरीत तुम्ही प्रामाणिकपणाने स्वत:चे काम करीत राहा. या वेळी तुमच्यावर लक्ष्मी खूष होईल. शनीमहाराज लाभस्थानी म्हणजे



सारा लाभच. लॉटरीचे तिकीट अवश्य घ्या. एखाद्या भाग्यवंताचे नशीब रेसमध्येदेखील उघडू शकेल. तुम्ही शुक्रवारचा उपवास करा. कुलदेवतेची आराधना करा. या वेळी बेकार असणाऱ्या व्यक्तींना हमखास नोकरी मिळू शकेल. लेखक, पत्रकार, कवी, कलावंत या व्यक्ती लोकांच्या कौतुकाच्या होतील. पत्रव्यवहारात यश मिळेल. मन आनंदी राहील. महिलांना माहेरची सावली मिळेल. दुरावा व त्रास, गैरसमज संपुष्टात येतील. मुलांची मदत होईल.

**तूळ :** प्रतिष्ठेची नोकरी मिळेल.

आधीच शनिमहाराज तुमच्यावर बेहद्द खूप होऊन गेले आहेत. तुमच्या भाग्यचक्राची सूत्रे त्यांनीं हाती घेतली आहेतच. नोकरी व धंदा या दोन्ही आघाड्यांवर तुमची सरशी होणार आहे. नोकरीच्या बाबतीत अनिश्चित अवस्था आता संपली आहे याची खात्री बाळगा. नोकरी सरकारी असो वा खाजगी असो तुमच्यावर मोठी जबाबदारी टाकण्यात येणार आहे. चालू नोकरीत तुमच्या दर्जात वाढ होईल. कला, विज्ञान, संशोधन, व्यापार यांचे ज्ञान असणाऱ्यांना गुण दाखवण्याची संधी मिळेल. व्यापारांत तुम्हाला नफा होईल. विशेष करून सौंदर्यप्रसाधने व उंची कापड यांत झालेले नुकसान भरून येईल. मात्र कायदा व नियम सोडून अजिबात वागू नका. कलावंत लोकांना गुणप्रदर्शनाची संधी मिळेल. महिलावर्गाने कलाविषयक उद्योगांत आपले मन गुंतवून घ्यावे. नोकरीत देखील त्यांना संधी मिळेल.

**वृश्चिक :** स्फूर्तिदायक घटना.

या वेळी तुमच्या भाग्याची सारी सूत्रे खरोखर रवि–शनीच्या हाती आहेत. भाग्य उदयाला येणे हे देखील भाग्यच होय. हर्शलची तुमच्या आर्थिक परिस्थितीवर असलेली पकड ढिली झालेली नाही. त्यामुळे खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. तरी पण एकंदरीत स्फूर्तिदायक असे बरेच काही घडू शकेल. मनोरथ पूर्ण होणार नसले तरी त्याला चालना मिळणारे बरेच काही घडेल. खताचा व्यापार, औषधी वस्तूंची विक्री, शेतमाल, भाजीपाला व साखरउद्योग यांत नव्या योजनांना वाव मिळू शकेल. याच धंद्यातील नोकरांना खास पगारवाढ मिळू शकेल. सरकारी नोकरीच्या बाबतीत कर्तबगारीला प्रोत्साहन मिळेल. मंगळवारी अपेक्षित काम होईल. महिलांनी भांडणात रस घेऊ नये. नोकरीविषयक मुलाखत भाग्याला कलाटणी देईल.

**धनु :** विचाराने वागा.

आठवा रवि–शनि हे ग्रह तसे तुमच्यापुढे कर्तृत्वाचे मोठे आवाहन उभे करणार आहेत. मनांत आणाल ते यशस्वी करून दाखवाल असे एखादे नवे क्षेत्र समोर दिसू लागेल; पण वरिष्ठ अधिकाऱ्यांवर धाडस करतांना विचारानेच पावले टाकायला हवींत. सहकारी व हाताखालची माणसे यांचा विरोध बराच जाणवणार आहे. आर्थिक बाजू मात्र भक्कम होईल. पैसा मिळवण्यासाठीं योजलेले उपाय यश देऊन जातील. व्यापारउदीम, उत्पादनाचा उद्योग चार पैसे मिळवून देईल. परिश्रमाला योग्य असे प्रोत्साहन मिळेल. सोमवार ते शुक्रवार प्रवास, लॉटरीत फायदा होईल. पोट व पाठ याला आजार असणाऱ्यांनी तब्येतीला जपावे. महिलांनी पित्तावर वेळीच उपचार करावेत. नोकरीत प्रगती होईल.

**मकर :** विजयाकडे वाटचाल

राशिस्वामी शनी समोरच कर्कराशीत डेरेदाखल झाल्यापासून तुमचे सारे तंत्रच बदलून गेले आहे. ज्यांच्यापुढे मान झुकवावी लागत होती तेच आता तुमच्या दृष्टीला दृष्टीदेखील देऊ शकणार नाहीत. राजकारण हा तुमचा प्राण आहे. राजकारणात आता तुमची सर्वत्र सरशी होईल. विरोधक मित्र बनून तुमचे स्तुतिपाठक बनतील. नोकरीबद्दल तुमच्या मनात असलेला संशय विरघळून जाईल. अनिश्चितता दूर होईल व नेमका हेतू साध्य होईल. तेल, रासायनिक खते, इंजिनियरिंग उद्योग, रबर या धंद्यातील नोकर मोठे भाग्यवान ठरावेत. वकिलीचा व्यवसाय अंग धरू शकेल. प्रवासात ओळखी होऊन त्या भावी उद्योगाला लाभकारक ठरतील. तब्येत सुधारू लागेल. शनिवारी उपास करा. महिलांना नोकरीत वरिष्ठ जागा व जबाबदारी स्वीकारावी लागेल. वृद्धांना तीर्थयात्रा घडेल.

**कुंभ :** विरोधकांची गय नको

गेल्या अनेक दिवसांपासून तुम्हाला घरी व बाहेर अनेक विरोधक त्रास देत आहेत. नोकरी-व्यवसायात तुमच्या नुकसानीसाठी कारवाया करीत आहेत. पण तुम्ही त्यांची आता अजिबात गय करू नका. तुम्हाला रवि-शनी आणि मंगळ यांचे इतके जबरदस्त बळ प्राप्त झाले आहे की या वेळी जे पाऊल टाकाल ते तुमच्या विजयाचे व यशाचे प्रतिक ठरावे. रासायनिक खते, औषधे, प्लॅस्टिक्स, रबर, साखर इत्यादि उद्योग व त्या त्या उद्योगातील या राशीची माणसे या वेळी भाग्यवान ठरतील. पगारवाढ, प्रमोशन, बदली, जबाबदारीत वाढ, वरिष्ठांची मर्जी, मालकाची कृपा असे काही तरी घडावे. बेकारांच्या बाबतीत नुसती सहानुभूती मिळेल. प्रत्यक्ष कामाला थोडा वेळ लागेल. महिलांनी स्वतःचा स्वतंत्र उद्योग आखून प्रयत्न करावेत. त्यांना पैसा मिळेल.

**मीन :** उद्योगात प्रगती

तुमच्यापैकी जे कुणी प्रोफेसर, शिक्षक, पत्रकार, लेखक असतील त्यांना या आठवड्यात खूपच महत्त्व येणार आहे. सर्वसामान्यपणे विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्या शैक्षणिक कक्षेत मान मिळवतील. बेकारांना या आठवड्यात नोकरीसाठी फारसे प्रयत्न करावे लागणार नाहीत. त्यांना कायम स्वरूपाची नोकरी मिळेल. वरिष्ठ अधिकारावर काम करणारे लोक या वेळी कामाच्या निमित्ताने परदेशी जाऊ शकतील. एखाद्या लेखकाला व पत्रकाराला परदेशी जाण्याचा योग येईल. रविवार महत्त्वाचा ठरेल. अपेक्षित व्यक्ती भेटेल. परीक्षार्थी विद्यार्थी पास होतील. व्यावसायिक मोठ्या दर्जाच्या परीक्षांत काहीजण भाग्यवान ठरतील. महिलांना सार्वजनिक कार्याचे मोठे फळ मिळेल. यश व पैसा हाती येईल. □ □


**मोफत ! मोफत ! मोफत !**

# पांढरे डाग

आमचे औषधाचा प्रभाव केवळ तीन दिवसातच पांढरे डागावर दिसू लागून त्याचा रंग बदलू लागतो. आमचे औषध अतिप्रभावी असून त्याचा एकवेळ अवश्य अनुभव घ्या. प्रचाराकरता, एक औषधाची कुपी ट्रायलकरता मोफत दिली जाते. रोगाचे सविस्तर वर्णनासहित संपर्क साधून त्वरित औषध मागवा.

**जवाहर चिकित्सा केन्द्र १०५**
पोष्ट : कतरीसराय ( गया )

क्रीडांगण

# रामचंदचं दिवास्वप्न

मुकुंद मणूरकर

भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार व विश्वचषक क्रिकेटस्पर्धेला गेलेल्या भारतीय संघाचे व्यवस्थापक श्रीयुत गुलाबराय रामचंद हे एक प्रचंड विनोदी गृहस्थ आहेत.

परवा भारतीय संघाला घेऊन अतिशय थंडपणाने हे मुंबईला परतले तेव्हा भारताच्या पराभवाची 'मीमांसा' त्यांनी केली. भारतीय संघाच्या पराभवाची कारणे या मथळ्याखाली जी बातमी आली ती अगदी आधाशीपणे वाचून काढली. काही तरी खळबळजनक वाचायला मिळणार असं वाटलं, कारण इंग्लंडबरोबर झालेल्या सामन्यात सुनील गावसकरने रडीचा डाव खेळला तेव्हा आपल्या व्यवस्थापक या पदाचे सर्व संकेत गुंडाळून या महाशयांनी तीव्र संताप व्यक्त केलेला होता. तेव्हा भारतीय संघाच्या पराभवाची रामचंदने केलेली परखड चिकित्सा आहे तरी काय ही उत्सुकता; पण कसचे काय न् कसचे काय? डोंगर पोखरून उंदीरसुद्धा मिळाला नाही तर जसं वाटेल तसं वाटलं.

इंग्लंडकडून मार खाल्ल्यानंतर न्यूझिलंडबरोबर सामना होता आणि या सामन्यातील यशापयशावर भारताच्या उपान्त्य फेरीतील प्रवेशाचं भवितव्य ठरणार होतं. हाही सामना आपण (ग्रेसफुली!) हरलोच आणि साखळीसामन्यातच बाद होण्याचा मान पदरात पडला. हा सामना आपण का हरलो? रामचंद म्हणतात,—'सुरुवातीला मदनलाल आणि मोहिंदर अमरनाथने बरी गोलंदाजी केली. नंतर बेदीने छानच गोलंदाजी केली. वेंकटराघवननेही चांगली गोलंदाजी केली. या दोघांचा कोटा संपल्यावर उरलेली षट्के परत मदनलाल व मोहिंदरने टाकली. त्यातही मदनलालने बरी गोलंदाजी केली; पण मोहिंदरने मात्र चांगली गोलंदाजी केली नाही व आपला पराभव झाला.' बस्स. आपल्या पराभवाची मीमांसा ही अशी आणि इतकीच!

हे म्हणजे लाला अमरनाथ एक्स्पर्ट कॉमेंट्रेटर म्हणून टेस्ट मॅचेसच्या वेळी कॉमेंट्स करतात तसं झालं. लाला अमरनाथच्या एक्स्पर्ट कॉमेंट्स कशा असतात? —बेदीने ॲलन नॉटचा त्रिफळा उडविलेला असतो. तेव्हा लाला म्हणतात' 'बेदीने नॉटला चांगलेच फसविले!' झाली एक्स्पर्ट कॉमेंट! आता नॉटचा जेव्हा त्रिफळा उद्ध्वस्त झालेला असतो तेव्हा बेदीने त्याला फसविलेले हे असतेच. मग त्यात विशेष असे तुम्ही काय सांगितलेत? खरी गोष्ट अशी असते की हा त्रिफळा इतक्या सहजासहजी उद्ध्वस्त झालेला नसतो. त्या आधीच्या सात-आठ ओव्हर्समध्ये बेदीने विशिष्ट प्रयत्न केलेले असतात. वाडेकरने क्षेत्ररक्षण आवळत आणलेले असते. काही मानसिक हल्ले नॉटवर केलेले असतात आणि मग नॉटचा त्रिफळा उडालेला असतो. पण हे काहीही न सांगता 'बेदीने नॉटला चांगलेच फसविले' ही कांडी लाला उगाळतात आणि त्याचे लेप श्रोत्यांच्या कानाला लावतात. क्रिकेटमधील एबीसीडी कळणारा लहान पोरगाही असा त्रिफळा वगैरे उडाल्यावर टाळ्या वाजवून 'आयला, काय काठी काढलीय् पण' अशी झणझीत प्रतिक्रिया व्यक्त करतो. लाला अमरनाथ हेच फक्त मवाळ भाषेत आपल्याला ऐकवतात इतकंच. रामचंदचंही असंच झालं. न्यूझिलंडबरोबरील सामन्यात आपलं 'काय' झालं हे रामचंदनी सांगितलं पण ते 'का' झालं हे मात्र सांगितलं नाही.

तरीही हे एक वेळ चाललं असतं. विनोदी म्हणण्याइतकं काही अजून हे झालं नव्हतं. पण खरी गंमत पुढंच आहे. आता रामचंद जर-तर च्या भाषेत बोलू लागतात. आपल्या 'जरतारी' वक्तव्यात एक गोष्ट त्यांनी गृहीतच धरली आहे. ती म्हणजे आपला उपांत्य फेरीत प्रवेश! आपला उपान्त्य फेरीत प्रवेश म्हणजे गाठ वेस्ट इंडिजशी पडणार होती. अशी जर आपली वेस्ट इंडीज्शी गाठ पडली असती तर आपलं काय झालं असतं? —रामचंद म्हणतात, 'आपण हा सामना जिंकलो असतो!! वेस्ट इंडीजला मारणं आपल्याला विशेष अवघड गेलं नसतं. कारण नुकतीच आपली वेस्ट इंडीज्बरोबर एक संपूर्ण मालिका झाली होती आणि त्यात जवळपास आपण आणि वेस्ट इंडीज समान दर्जाचे ठरलो होतो. त्यांच्या सर्व खेळाडूंना आम्ही व्यवस्थित जोखून होतो. त्यामुळे चांगली लढत देऊन आम्ही त्यात विजयीही ठरलो असतो; मग आम्ही अंतिम फेरीत प्रवेश केला असता'......तरी बरं, की अंतिम सामन्यातही आम्ही ऑस्ट्रेलियाला पराभूत करून विश्वचषकही जिंकला असता असं रामचंद म्हणाले नाहीत. अर्थात् मनात ते असं म्हणाले असतीलही. कारण दिवास्वप्न पहाण्यात ते पटाईत दिसतात.

हे दिवास्वप्नाचं प्रकरण एकंदरीत बरं असतं आणि सोपंही असतं. एखादी असाध्य गोष्ट साध्य झालीच आहे अशी मनाशी समजूत करून घ्यायची. विचारांचे लगाम खेचायचे. मग पुढे घोडदौड करायला प्रचंड मैदान असतंच. विचारांना भलत्याच दिशेला वळविणं मग जमून जातं. अपयश आलं की ते का आलं याचा विचारच करायचा नाही, तर हे अपयश आलं नसतं तर काय काय झालं असतं या विचारात दंग होऊन जायचं.

आता भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्डाने एक करावं. व्यवस्थापकपदावरून रामचंदना सुट्टी द्यावी आणि क्रि. कं. बो. चे अधिकृत प्रवक्ते किंवा प्रसिद्धिअधिकारी म्हणून त्यांची नव्याने नेमणूक करावी. पराभवामुळे भारतीय जनतेत मरगळ आल्यास आणि ती क्रिकेट संघास शिव्या देऊ लागल्यास तिला यापासून परावृत्त करून दिवास्वप्नात मशगुल करण्याचे व जनतेत क्रिकेट-वेड कायम तेवत ठेवण्याचे पवित्र कार्य रामचंद यशस्वीपणे करतील. नाही तरी आपल्या क्रिकेट कंट्रोल बोर्डाला

हवंय् तरी काय ? जनता जितकी जास्त क्रिकेटवेडी होईल तितकी यांची चंगळच ! □

## क्रि. कं. बो. चा अधाशीपणा

आपल्या क्रि. कं. बो. इतके दुसरे कोणत्याही देशाचे क्रिकेट बोर्ड श्रीमंत नसेल. तरीही आपल्या बोर्डाला अधाशीपणाची यत्किंचितही मर्यादा नाही. पैशासाठी हे भयंकर हपापलेले असतात.

पाकिस्तानबरोबर सामने खेळण्यासाठी हे गेली काही वर्षे प्रयत्न करीत होते आणि त्यात यश येऊन यंदा भारत–पाकची कसोटी-मालिका घेण्याचे नक्की झाले. आधीच भरगच्च असलेल्या कार्यक्रमात पाकिस्तानच्या दौऱ्याची भर पडली. पाकिस्तानात जाऊन आपण तीन सामने खेळायचे व परतफेड म्हणून पाकिस्तानने इथे येऊन चार सामने खेळायचे ठरले; पण नुकतेच पाकिस्तान क्रि. कं. बोर्डाने कळविले की पाकिस्तानला तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत स्वारस्य नाही. खेळायची असेल तर पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळा. या सूचनेवर आपल्या क्रि. कं. बो. ने वरवर नाराजी दाखवली तरी मनातून ते खूषच झाले. आपण तीन सामने मागतो काय अन् पाच सामने पदरात पडतात काय ? वा, वा ! म्हणूनच बोर्डाचे अध्यक्ष पुरुषोत्तमदास रुंगठांनी मोठ्या मानभावीपणाने सांगितले की, 'पाकिस्तानच्या सूचनेचा आम्ही समाधानकारकरीत्या विचार करू !' पण दरम्यान पाकिस्तानी संघटकांनी तार पाठवून हा दौराच रद्द केल्याचे कळविले आणि भारतीय खेळाडूंची संभाव्य शारीरिक आणि मानसिक ताणातून मुक्तता केली.

पैसा मिळविण्याची कुठलीही संधी आपले क्रि. कं. बो. सोडत नाही. पहिली विश्वचषक क्रिकेटस्पर्धा चालू असतानाच बोर्डाचे पदाधिकारी दुसरी विश्वचषकस्पर्धा भारतात घेण्यासाठी प्रयत्न करीत होते आणि अखेर आंतरराष्ट्रीय संघटनेकडून मान्यता मिळविण्यात ते यशस्वीही ठरले.

आता एक दिवसाच्या सामन्यात आपली काय परवड झाली हे सर्वश्रुत आहेच. असं असताना ही स्पर्धा भारतात भरविण्याचं प्रयोजन काय ? तर निव्वळ पैसा मिळविणे हेच !

परवा विविध भारतीवरील एका कार्यक्रमात विजय मर्चंट यांनी सूचना केली की, आता ही स्पर्धा भरविण्यासाठी काही धनिक कंपन्यांनी पुढे यावे.

पण मर्चंटसाहेब, याची आपल्याला आवश्यकता काय ? इंग्लंडमध्ये हे ठीक आहे. तिथल्या क्रिकेटसंघटकांना क्रिकेट सामन्यातून पैसे मिळण्याची विशेष शक्यता नसते. म्हणून स्पॉन्सर करण्यासाठी ते एखाद्या कंपनीला पाचारण करतात. आपल्याकडे तशी परिस्थिती नाही. मागे वाडेकर गौरव सामना बुश कंपनीला आयोजित करण्यास सांगून मोठ्या रकमेला मुकण्याचा मूर्खपणा केल्याबद्दल बोर्डाच्या काही पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. आता असा आततायीपणा ते मुळीच करणार नाहीत, उगीच कोण असं फुकटंफाट पैशात वाटेकरी निर्माण करील ?

तेव्हा मर्चंटसाहेब, अशी सूचना तुम्ही पुन्हा करू नका. तुमच्या नेहमीच्या 'गुडी–गुडी' बोलण्याचे कौतुक बोर्डाचे पदाधिकारी नेहमीच करीत असतात; पण त्यांना इंगळ्या डसणाऱ्या सूचना तुम्ही केल्यात तर तुमचा धिक्कारच होईल ! □

## चॅप-टेल

ऑस्ट्रेलियाचा यशस्वी कप्तान आयन चॅपेल यंदाचा इंग्लंडदौरा संपल्यानंतर कप्तानपदावरून स्वखुषीने निवृत्त होणार आहे. आतापर्यंत नवोदितांना संधी किंवा व्यावसायिक / घरगुती अडचणींची कारणे सांगून अनेक खेळाडू कप्तानपदावरून दूर झाले, तर फॉर्ममध्ये नाही म्हणून कप्तानपदावरून उठण्याचा विक्रम इंग्लंडच्या माईक डेनिसने केला होता.

पण आयन चॅपेलच्या निवृत्तिमागे यासारखं कुठलंही कारण नाही. एक नवीनच कारण त्याने सांगितले.

तो म्हणाला, 'ऑस्ट्रेलियाचा कप्तान म्हणून मला सारखं कुठल्या ना कुठल्या कॉकटेल पार्टीला हजर रहावं लागतं. त्यामुळे मी जाम वैतागलोय ! आणि म्हणूनच मी कप्तानपद सोडणार आहे !!


# साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये

सहामाही : वीस रुपये

परदेश : ( जलमार्गे )

पंचावन्न रुपये

# पोर्तुगाल - हुकूमशाहीकडून हुकूमशाहीकडे : पृष्ठ ३ वरून

कामगार संघटना, स्थानिक संस्था यातून या समित्यांचे प्रतिनिधि निवडले जातील. राजकीय पक्षांना त्यात स्थान असणार नाही. पाश्चात्य पद्धतीच्या लोकशाहीवर विश्वास असणाऱ्या पक्षांना डावलून लष्करी नेते आणि कम्युनिस्ट यांची हुकुमशाही प्रस्थापित करण्याच्या उद्देशानेच ही योजना तयार करण्यात आली असल्याचा समाजवाद्यांचा आरोप आहे. लष्करी सत्ता तीन ते पाच वर्षे राहील, या पूर्वीच्या वचनाचा उल्लेखही नव्या घोषणेत नाही. यावरून लष्करी राजवट चिरस्थायी करण्याचा लष्करी नेत्यांचा उद्देश आहे असे त्यांना वाटते. पाश्चात्य पद्धतीची लोकशाही पोर्तुगालमध्ये येणार नाही हे या घोषणेवरून स्पष्ट झाले.

या हुकुमशाही राजवटीत वृत्तपत्रस्वातंत्र्य कसे दडपले जाणार आहे याची चुणुक समाजवाद्यांचे 'रिपब्लिक' हे मुखपत्र ज्या पद्धतीने बंद पाडण्यात आले त्यावरून समाजवाद्यांना आली. ज्या छापखान्यात हे वृत्तपत्र छापले जात असे तेथील कामगारांनी तेथे छापण्याचे नाकारले तेव्हा लष्करी राजवटीने ते बंद केले. या निर्णयाच्या निषेधार्थ समाजवाद्यांनी मंत्रिमंडळाबाहेर पडण्याची धमकी दिली होती; पण वृत्तपत्र पुनः समाजवाद्यांना सुरू करता येईल असे आश्वासन लष्करी नेत्यांनी दिल्यावर समाजवाद्यांनी राजिनाम्याचा विचार सोडला; पण हे आश्वासन मोडून लष्करी राजवटीने ते वृत्तपत्र कामगारांच्या ताब्यात दिले व त्यांच्या नियंत्रणाखाली त्याचे प्रकाशन पुनः सुरू झाले आहे. कामगारसंघटना कम्युनिस्ट नियंत्रणाखाली आहे तेव्हा या वृत्तपत्रातून यापुढे कम्युनिस्ट भूमिकेचाच प्रचार होत जाईल हे उघड आहे. समाजवादी पक्ष मंत्रिमंडळातून बाहेर पडण्यास हेहि एक महत्त्वाचे कारण आहे. 'रिपब्लिक' पत्राबद्दलचे लष्करी राजवटीचे हे धोरण लक्षात घेता लष्करी नेते आणि त्यांच्या बाजूचे कम्युनिस्टगट यांच्याशिवाय इतर राजकीय पक्षांना पोर्तुगालमध्ये यापुढे स्थान नाही. त्यांना आपली वृत्तपत्रेही आपल्या धोरणानुसार चालविता येणार नाहीत. वृत्तपत्रस्वातंत्र्याची ही मुस्कटदाबी आहे.

पोर्तुगालमधील राजकारणास यापुढे कोणते वळण मिळेल ? लष्करी नेत्यांच्या हुकुमशाही धोरणाविरुद्ध जनमत संघटित करण्याचे समाजवादी पक्षाने ठरविले आहे; पण त्यांना तसे करण्यास कितपत स्वातंत्र्य दिले जाईल? उलट प्रतिक्रांतीच्या प्रयत्नाचा आरोप ठेवून समाजवादी पक्षाला बंदी केली जाण्याची शक्यता आहे. लष्करी नेत्यांच्या समाजवादी क्रांतीबद्दलच्या कल्पना स्पष्ट नाहीत; पण त्यांच्यावर सध्या कम्युनिस्टांचा प्रभाव असल्याचे दिसते. पोर्तुगालचा कम्युनिस्ट पक्ष मास्कोवादी आहे. पोर्तुगालमध्ये आपल्या बाजूची राजवट आली तर रशियाला हवीच आहे; पण कम्युनिस्ट पद्धतीचा कार्यक्रम अंमलात आणण्याच्या बाबतीत घाई करू नका असा सल्ला मॉस्कोकडून पोर्तुगीज कम्युनिस्टांना मिळाला असल्याच्या बातम्या आहेत. अमेरिकेशी सलोख्याच्या व सहकार्याच्या संबंधात ज्यामुळे बिघाड येईल असे काहीहि रशिया सुद्धा करू इच्छित नाही. कारण पोर्तुगाल कम्युनिस्ट राजवटीखाली जाणे हा अमेरिकेच्या हितसंबंधांना मोठा धक्का असून अशी राजवट उलथून पाडण्यासाठी अमेरिका हालचाली करण्याची शक्यता दूर सारता येत नाही, म्हणून पोर्तुगाल सध्या आपल्या नियंत्रणाखाली उघडपणे न आणता आणि तेथे कम्युनिस्ट क्रांतीचा कार्यक्रम जोरदारपणे हाती न घेता, आपल्या बाजूच्या लष्करी नेत्यांच्या हातीच तेथील सत्तेची सूत्रे सध्या ठेवावीत असे कम्युनिस्टांचे व रशियाचे धोरण दिसते.

पोर्तुगालमध्ये सव्वा वर्षापूर्वी झालेल्या क्रांतीने तेथे जवळजवळ पन्नास वर्षे अस्तित्वात असलेली फॅसिस्ट हुकुमशाही नष्ट झाली; पण त्यानंतर लोकशाहीच्या दिशेने पावले पडण्याऐवजी कम्युनिस्ट पद्धतीच्या हुकुमशाहीचे रोखाने प्रगति होताना दिसत आहे. एका हुकुमशाहीकडून दुसऱ्या हुकुमशाहीकडे अशी ही वाटचाल आहे पण त्याबद्दल केवळ क्रांतीच्या नेत्यांना दोष देणे योग्य होणार नाही. समाजवाद आणण्यासाठी पाश्चात्य लोकशाहीचे साधन अपुरे, असमर्थ आणि अयशस्वी ठरल्याचा अनुभव अनेक देशात आलेला आहे. समाजवादी निवडणुका जिंकून सत्तेवर येऊ शकतात पण समाजवाद आणू शकत नाहीत. लोकशाही समाजवादी चळवळीला यश का येत नाही याचे आत्मनिरीक्षण करून चळवळीची नव्या पायावर मांडणी कशी करावयाची याचा विचार करण्याची वेळ आली आहे. □




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० यथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**